दैनिक
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.
RNI No.MAHMAR/2019/79184
www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : ३०६ वा | शुक्रवार दि. १ सप्टेंबर २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

### यांची राजकीय दुकानं बंद होतील म्हणून एकत्र :उपमुख्यमंत्री देवेंद्र



**मुंबई ।** मुंबईत इंडिया आघाडीची बैठक सुरू झाली आहे. या बैठकीवर भाजप नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टोला लगावला आहे. ते म्हणाले की, केवळ मोदीजी हटाव एवढा एकमेव अजेंडा घेऊन हे सर्व पक्ष एकत्र आले आहेत. मात्र अशा प्रकारचा अजेंडा कुणी कितीही आणला तरीही लोकांच्या मनात जोपर्यंत मोदीजी आहेत. तोपर्यंत ३६ काय १०० पक्ष एकत्र आले तरीही लोकांच्या मनातून ते मोदींना काढू शकत नाहीत. गरीब कल्याणाचा अजेंडा त्यांनी राबवला त्यामुळेच मोदीजी सामान्यांच्या मनात आहेत.

## न्यूज कॉलम

### वृक्षतोडप्रकरणी तिघांवर गुन्हा

**धुळे ।** देवपुरातील तुळशीरामनगर महापालिकेच्या मालकीच्या उद्यानात बेकायदेशीररीत्या५२ वृक्षांची कत्तल केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला. २२ ऑगस्टला देवपुरातील नकाणे रोडवरील तुळशीरामनगरात महापिलिकेच्या निरनिराळ्या ५२ वृक्षांची अवैधरीत्या कत्तल झाली. याबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर घटनास्थळी प्रत्यक्ष पाहणी, पंचनाम्याच्या अंती मंगळवारी महापालिकेच्या वृक्ष अधिकार्यांच्या तक्रारीवरून संशयित चंद्रकांत शिरसाट, ललित भाले व अन्य एक अशा तिघांविरूद्ध गुन्हा दाखल झाला.

### दुचाकी घसरून चालकाचा मृत्यू

**धुळे ।** वराह आडवे आल्याने दुचाकी घसरून चालकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. शिवाजी चैत्राम पाटील (वय ५०, रा. गरताड, ता. धुळे) असे त्यांचे नाव आहे. शिवाजी पाटील मंगळवारी (ता. २९) सकाळी नऊच्या सुमारास इलेक्ट्रिक दुचाकी (एमएच १८, बीडब्ल्यू ७४६६ ) ने गरताडकडून धुळ्याकडे येत होते. यादरम्यान मिलिंद सोसायटीजवळ (कुमारनगर) वराह आडवे आल्याने अपघात झाला.

# देशाचा पैसा बाहेर पाठवला जातोय : राहुल गांधी

**मुंबई । प्रतिनिधी**

राहुल गांधी यांनी विदेशातील वृत्तपत्रांचा हवाला देत अदानींच्या गुंतवणूकीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. देशात पारदर्शकता असणं गरजेचं आहे. पण तसे होत नाही. अदानींच्या गुंतवणुकीसाठी पैसा कुणाचा आहे. एक व्यक्ती देशातील सर्व गोष्टी खरेदी करू लागला आहे. त्यावर मोदी गप्प का आहेत. सीबीआय, ईडी अदानींना प्रश्न का विचारत नाही. देशाचा पैसा बाहेर पाठवला जात आहे. ज्यांच्या माध्यमातून पैसे पाठवले जात आहेत, ते सर्व मोदींच्या जवळचे आहेत, असा घणाघात राहुल गांधी यांनी केला. ते मुंबईत पत्रकारांशी संवाद साधत होते. इंडिया आघाडीच्या बैठकीसाठी ते या ठिकाणी दाखल झालेले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जवळचे उद्योगपती गौतम अदानी यांच्या कंपनीत चीनी व्यक्तीची गुंतवणूक आहे, त्याची संसदेच्या संयुक्त समितीमार्फत चौकशी करावी अशी मागणी काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी केली आहे. अदानी यांच्या कंपनीच्या माध्यमातून १ अब्ज डॉलर्स हे भारताबाहेर गेले आणि नंतर पुन्हा अदानी यांच्या कंपनीत गुंतवण्यात आले असाही आरोप त्यांनी केला. राहुल गांधींनी केलेले हे सर्व आरोप अदानी समूहाने फेटाळले आहेत. त्यांनी या संबंधित एक निवेदन प्रसिद्ध करुन हे आरोप जुनेच असून त्यामध्ये समूहाला क्लीन चिट मिळाल्याचं स्पष्ट केलं आहे.

अदानी यांच्या कंपनीत काही लोकांनी छुपी गुंतवणूक केली आहे. जवळपास १ अब्ज डॉलर्स हे अदानी यांच्या कंपनीच्या माध्यमातून बाहेर वेगवेगळ्या देशात गेले आणि नंतर ते परत आले. त्या पैशातूनच आता अदानी हे विमानतळ आणि इतर प्रकल्प राबवत आहेत. हा पैसा कुणाचा आहे? अदानींचा आहे की आणखी कुणाचा? दुसऱ्या कुणाचा असेल तर ते कोण आहेत याची चौकशी करावी. विनोद अदानी हे या मागचे मास्टरमाईंड असून ते गौतम अदानी यांचे बंधू आहेत असा आरोप राहुल गांधी यांनी केला. अदानी यांच्या कंपनीमध्ये नासर अली शाबान अहली आणि चांग चुंग-लिंग यांची गुतंवणूक आहे. अदानी जर भारतात विकास प्रकल्प राबवतात तर त्यांच्या कंपनीमध्ये चीनी व्यक्तीचा पैसा कसा? अदानींची कंपनी ही संरक्षण क्षेत्रात काम करत आहे, मग चीनी व्यक्तीची गुंवतणूक त्यामध्ये कशी काय? गौतम अदानी यांच्या कंपनीमध्ये दोन व्यक्तींची गुंतवणूक असून ती का आहे याची चौकशी केली पाहिजे. अदानी प्रकरणावर पंतप्रधान नरेंद्र मोदी गप्प का आहेत असा सवाल राहुल गांधी यांनी विचारला. तसेच ईडी, सीबीआय हे अदानी यांची चौकशी का करत नाहीत असा सवालही त्यांनी केला.



### सेबीचा अधिकारी एनडीटीव्हीचा संचालक

**सेबीची चौकशी झाल्याचे राहुल गांधी म्हणाले- त्यांनी या प्रकरणात क्लीन चिट दिली. क्लीन चिट देणारे अधिकारी एनडीटीव्हीचे संचालक आहेत. हे सर्व मिसळलेले लोक आहेत. शेअर बाजार फुगवला जात आहे. पैशाने मालमत्ता खरेदी केल्या जात आहेत. अदानी आणि मोदी यांचे नाते असल्याचे विदेशी वृत्तपत्रे सांगत आहेत. जी-२० शिखर परिषद भारताच्या प्रतिष्ठेच्या असल्याचे सांगितले जात आहे. भारतातून १ अब्ज डॉलर्स बाहेर जात आहेत. यामुळे भारताची प्रतिमा खराब होत आहे. जेपीसी लागू करून अदानींची चौकशी का केली जात नाही, पंतप्रधान यावर का बोलत नाही. संपूर्ण चौकशी झाली पाहिजे, असा प्रश्न राहुल गांधी यांनी उपस्थित केला.**

### मुंबईत इंडियाची बैठक

**विरोधी पक्षांची युती असलेल्या इंडिया नॅशनल डेव्हलपमेंटल इन्क्लुसिव्ह अलायन्स (इंडिया) ची तिसरी बैठक आजपासून मुंबईत सुरू होत आहे. ही बैठक दोन दिवस चालेल. या बैठकीला २८ पक्षांचे सुमारे ६३ नेते उपस्थित राहणार असल्याचे शरद पवार यांनी सांगितले. कोणता पक्ष, कुठून, किती जागांवर निवडणूक लढवणार (आसनवाटप) याचा निर्णय बैठकीत घ्यायचा आहे. महाआघाडीत सहभागी पक्ष अनेक राज्यांत एकमेकांच्या विरोधात आहेत. यापूर्वी, काँग्रेस नेते पीएल पुनिया म्हणाले होते - लोकसभा निवडणुकीत भारत आघाडी जिंकल्यानंतरच पंतप्रधानपदासाठी नाव निश्चित केले जाईल. निवडून आलेले खासदारच पंतप्रधान निवडतील.**

### इंडिया आघाडीच्या नावाने भाजपविरोधी पक्ष संघटनांची धुळ्यात एकजूट

# आगामी निवडणूका एकदिलाने लढण्यासह पाच ठराव संमत





**धुळे । प्रतिनिधी**

मुंबईत इंडिया आघाडीच्या नावाने गुरुवारी देशभरातील भाजपविरोधी पक्षसंघटनांची बैठक होत असताना काँग्रेसच्या वरिष्ठांनी राज्यातील सर्व जिल्ह्यांना दिलेल्या आदेशानुसार धुळे जिल्ह्यातही काँग्रेस जिल्हाध्यक्ष शामकांत सनेर यांनी आयोजित केलेल्या सर्वपक्षीय इंडिया मीट बैठकीला चांगला प्रतिसाद लाभला. गुरुवारी शहरातील काँग्रेस भवनमध्ये पार पडलेल्या या बैठकीला भाजपविरोधी पक्ष, संघटनांचे सुमारे २०० प्रतिनिधींची उपस्थिती लाभल्याने इंडिया आघाडीचे प्रतिबिंब पाहावयास मिळाले.

या बैठकीत उपस्थित प्रतिनिधींनी भाजपच्या ध्येयधोरणांवर कडाडून टीका केली. तसेच यावेळी पाच ठराव सर्वानुमते संमत करण्यात आले. त्यात धुळे जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा तसेच पीकविम्याची २५ टक्के अग्रीम रक्कम तात्काळ शेतकर्यांच्या बँक खात्यात जमा करा, धुळे मनपात बोकाळलेल्या भ्रष्टाचाराची स्वतंत्र एसआयटीमार्फत चौकशी करा, धुळे जिल्ह्यातील अवैध धंदे पूर्णपणे बंद करुन जिल्हा गुन्हेगारीमुक्त करा, केंद्रीय तपास यंत्रणांचा धाक दाखवून राजकीय मंडळींचा भाजपमध्ये प्रवेश करुन घेण्याचा निषेध, इंडिया आघाडी ठरवेल त्या उमेदवाराचा सर्वांनी एकदिलाने प्रचार करुन निवडणूका जिंकणे या विषयांचे ठराव संमत झाले. या बैठकीला काँग्रेस जिल्हाध्यक्ष शामकांत सनेर, माजी आ. वसंतराव सुर्यवंशी, अंनिसचे राज्य अध्यक्ष अविनाश पाटील, शिवसेना उबाठाचे माजी आ. प्रा. शरद पाटील, अतुल सोनवणे, महेश मिस्त्री, डॉ. सुशील महाजन, किरण जोंधळे, शुभांगी पाटील, कैलास पाटील, पंकज गोरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे रणजितराजे भोसले, जितेंद्र मराठे, दीपक देवरे, विमल बेडसे, काँग्रेसचे डॉ. अनिल भामरे, डॉ. दरबारसिंग गिरासे, गुलाबराव कोतेकर, भगवान गर्दे, बाजीराव पाटील, प्रमोद सिसोदे, बापू खैरनार, गायत्री जयस्वाल, बानुबाई शिरसाठ, रिपाई गवई गटाचे प्रा. बाबा हातेकर, सपाचे अमिन पटेल, बसपाचे अनिल दामोदर, वंचितचे राज चव्हाण, कॉ. एल. आर. राव, आपचे हितेंद्र पवार, शकील अहमद, डॉ, एस. टी. पाटील, सुरेश बैसाणे यांच्यासह भाजपविरोधी पक्षसंघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. राष्ट्रगीताने बैठकीचा समारोप झाला. शेवटी काँग्रेस भवनसमोर रस्त्यावर फटाक्यांची आतषबाजी करीत भाजपविरोधी एकजुटीचा जल्लोष करण्यात आला.

# शासकीय तंत्रनिकेतन ग्रंथालय इमारतीचा शुभारंभ आ.फारुख शाह यांचे हस्ते संपन्न

**धुळे । प्रतिनिधी**





धुळे शहरातील नागरिकांसाठी शासनाच्या विविध इमारतीसाठी आ.फारुख शाह यांनी शेकडो कोटी रुपयांचा निधी आणला आहे तो एक रेकॉर्ड आहे त्याचाच एक भाग म्हणून सार्वजनिक बांधकाम उपविभाग धुळे अर्थसंकल्पीय तरतुदी अंतर्गत शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन संस्थेच्या परिसरात ग्रंथालय इमारत व आवार भिंतीचे बांधकाम करणे कामाचा शुभारंभ आ.फारुख शाह यांच्या हस्ते करण्यात आला.

धुळे शहरातील एमआयडीसी येथील विभागीय कार्यालय फायर स्टेशन आदिवासी प्रकल्प इमारत दारूबंदी कार्यालय जिल्हा परिवहन कार्यालय जजेस क्वार्टर, जिल्हा रुग्णालयाच्या नवीन २०० खाटांचे बांधकाम, हिरे मेडिकल येथील वस्तीगृह बांधकाम यासाठी आ.फारुख शाह यांनी शासनाकडून शेकडो कोटीच्या निधी आपल्या प्रयत्नाने शहरासाठी उपलब्ध करून दिला आहे. आजपर्यंत शहराच्या विविध कार्यालय इमारतीसाठी रेकॉर्ड निधी आणण्याचे काम आ.फारुख शाह यांनी केले आहे. तसेच सर्व कार्यालय एका छताखाली आणण्यासाठी प्रशासकीय इमारतीचे काम सुद्धा लवकर सुरू होणार आहे. या सर्व कामाच्या एक भाग म्हणून आज आ.फारुख शाह यांच्या हस्ते शासकीय तंत्रनिकेतन येथे ग्रंथालय व आवार भिंतीचे कामाचे शुभारंभ करण्यात आला. यावेळेस आ.फारुख शाह यांचेसोबत परिसरातील प्रतिष्ठित नागरिक व शासकीय तंत्रनिकेतन येथील प्राचार्य डॉ.वाडेकर,के. आर.पवार,डॉ.अन्सारी,इतर शिक्षक वृंद सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता आर.आर.पाटील, उपअभियंता किरण पाटील, राहुल माळी, शहेबाज शाह, नगरसेवक नासिर पठाण, नगरसेवक गनी डॉलर, नगरसेवक आमिर पठाण,डॉ. दीपश्री नाईक, डॉ.बापुराव पवार, आसिफ शाह,प्यारेलाल पिंजारी, निजाम सैय्यद, कैसर अहमद, नजर पठाण, अकीब अली, माजिद पठाण, जीड्डुया पहिलवान, सिराज मलिक, अजहर सय्यद, शहजाद मंसूरी, शाहरुख कुरेशी, मोईन शेख,साकीब शाह,जुबेर शेख, समीर शाह, नदीम मिर्झा, मुजाहीद बागवान,साजिद शाह आदी उपस्थित होते.

# धुळेकरांना पंधरा दिवसात मिळणार दोन दिवसाआड पाणी : अंपळकर



**धुळे । प्रतिनिधी**

धुळेकरांचा जिव्हाळ्याचा पाणीप्रश्न लवकरच सुटणार असून धुळेकरांना आगामी १५ दिवसांत दोन दिवसाआड पाणी पुरवठा होणार असल्याची ग्वाही भाजप महानगराध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांनी दिली आहे. आज साक्रीबायपास रोडवर ट्युबलर मशिन पहाणी प्रसंगी ते बोलत होते.

अक्कलपाडा प्रकल्पातील ३३ के. व्ही.सबस्टेशनला आवश्यक मशीन धुळे शहरात दाखल झाले. साक्री बायपासरोडवर या मशिनची भाजपा महानगराध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांनी सहकार्यांसह पहाणी केली. यावेळी अंपळकर म्हणाले की, आगामी पंधरा दिवसांत सदर मशीन बसविण्याचे काम पुर्ण होईल. त्यामुळे धुळेकरांना दोन दिवसाआड पाणी देणे शक्य होणार आहे. सदर मशिन हे चेन्नई येथून मागविण्यात आले आहे. याकामी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री गिरीष महाजन, प्रदेश महासचिव विजय चौधरी, भाजपा खा.डॉ. सुभाष भामरे, आ.जयकुमार रावल, आ.अमरिशभाई पटेल, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे आदी भाजपा प्रमुख पदाधिकार्यांनी पाणीप्रश्न सोडविण्यासाठी सर्वो तोपरी प्रयत्न करण्याच्या सुचना केल्या होत्या. लवकरच पाण्याचा प्रश्न मिटणार असल्याचेही ते म्हणालेत. याप्रसंगी भाजपा महानगराध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांचेसह उपायुक्त विजय सनेर, अभियंता सी.सी.बागूल, कल्याणी अंपळकर, हिरामण गवळी, जितेंद्र चौटीया, विनोद थोरात, योगेश मुकूंदे, प्रविण अग्रवाल, प्रकाश उबाळे, वैशाली शिरसाठ, सुहास अंपळकर, यांची उपस्थिती होती.

# गुळवंच प्रकल्पातील पिडितांच्या प्लॉटवर सुविधांसाठी ७६ कोटी ५० लाखांच्या प्रस्तावास शासनाकडून मान्यता

### खा.हेमंत गोडसे यांची माहिती

**नाशिक । प्रतिनिधी**

इंडिया बुल्स प्रशासनाने पिडित शेतकऱ्यांच्या प्लॉटवर कोणत्याही प्रकारच्या सोयी - सुविधा न केल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले आहे. यातून मार्ग काढण्यासाठी गेल्या काही वर्षांपासून खा.हेमंत गोडसे प्रयत्नशील आहेत. खा. गोडसे यांच्या प्रयत्नांना आता यश आले आहे. उद्योग विभागाच्या जिल्हा प्रशासनाने शासनाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविलेल्या ८० कोटी रुपयांचा प्रस्तावापैकी शासनाने औद्योगिक पायाभूत सुविधांची निर्मिती व विकास या योजनेंतर्गत ७६ कोटी ५० लाखांच्या निधीला नुकतीच शासनाकडून प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. शासनाकडून प्रशासकीय मान्यता मिळाल्याने आता लवकरच उपलब्ध असलेल्या पिडितांच्या प्लॉटवर वीज, रस्ते, पाणी, गटार आदी मूलभूत सुविधा उपलब्ध होणार असल्याची माहिती खा.गोडसे यांनी दिली आहे.

गेल्या अनेक वर्षांपूर्वी तात्कालीन सरकारने इंडिया बुल्ससाठी सिन्नर तालुक्यातील गुळवंच येथील शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहित केलेल्या आहेत. पैकी काही जमीनींवर उद्योग उभारले असून काही जमिनी मात्र पडून आहेत. याबरोबरच पीडितांसाठी एकशे ऐंशी हेक्टर जमिनीवर दोनशे प्लॉट तयार करण्यात आलेले आहे. परंतु ठरवल्याप्रमाणे इंडिया बुल्स प्रशासनाने सदर प्लॉटवर कोणत्याही सोयी -सुविधांची निर्मिती केलेली नाही. यामुळे पिडीत शेतकऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले आहे. पिडित शेतकऱ्यांसाठी असलेल्या राखीव दोनशे प्लॉटसाठी सोयी सुविधा व्हाव्यात यासाठी गेल्या काही वर्षापासून खा.हेमंत गोडसे सतत प्रयत्नशील होते. खा. गोडसे यांनी या कामासाठी अनेकदा मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि उद्योगमंत्री यांची भेट घेत पिडीतांसाठी राखीव असलेल्या प्लॉटवर सोयी सुविधा उभारण्यात येण्याची शासनाकडे मागणी केली होती. खा.गोडसे यांचा उद्योग विभागाच्या जिल्हा प्रशासनाकडेही सततचा पाठपुरावा सुरू होता. यातूनच पिडित शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असलेल्या प्लॉटवर सोयी -सुविधा उभारण्यासाठी उद्योग विभागाच्या जिल्हा प्रशासनाने शासनाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी काही महिन्यांपुर्वी ८० कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर केला होता. पैकी ७६ कोटी ५० लाख रुपयांच्या निधीला शासनाच्या उद्योग विभागाने औद्योगिक पायाभूत सुविधांची निर्मिती व विकास योजनेंतर्गत मंजुरी दिली असून इतर खर्चासह रक्कम ८८ कोटी रुपये शासनाकडुन उपलब्ध होणार आहेत.

# धोंडी धोंडी पाणी दे, अक्कलपाडानं पाणी धुळ्याले मिळू दे !

### शिवसेनेने घातले वरून राजाला साकडे, सत्ताधार्यांचा निषेध

**धुळे । प्रतिनिधी**





धुळेकरांची पाण्याची प्रतिक्षा लवकर संपावी, संपुर्ण जिल्ह्यात भरपुर पाऊस पडावा याकरीता शिवसेना महानगर च्या वतीने अनोख्या पध्दतीने वरून राजाला 'धोंडी धोंडी पाणी दे, अक्कलपाडानं पाणी धुळयाले मिळू दे' म्हणत धोंडींची मिरवणूक संबळ वाद्यासह काढण्यात आली.

महानगर प्रमुख धीरज पाटील व विभाग प्रमुख सागर निकम यांनी डोक्यावर धोंडी मिरवली. धुळे शहरासह जिल्हाभर पावसाने पाठ फिरवल्यामुळे संपुर्ण जिल्हाभरातील शेतकरी हवालदिल झाला आहे. उभी पिके पावसाअभावी करपली आहेत. धुळे शहरासह जिल्ह्यात २५ टक्के सुध्दा पाऊस दोन महिन्यांत झालेला नाही. तिच परिस्थिती पिण्याच्या पाण्यासंदर्भात झाली असून धुळे शहरातील नकाणे व डेडरगाव तलाव पाण्याअभावी कोरडेठाक झाले आहेत. परिणामी,आगामी काळात शहरात भीषण पाणी टंचाईची परिस्थिती निर्माण होणार आहे. एकीकडे ही परिस्थिती असतांना साक्री तालुक्यातील पश्चिम पट्ट्यात झालेल्या पावसामुळे लाटीपाडा, जामखेली, मालनगाव धरण भरल्यामुळे अक्कलपाडा मध्यम प्रकल्पात चांगला जलसाठा निर्माण झाला आहे. धुळे महानगर पालिकेच्या माध्यमातून धुळे शहराचा पाणी प्रश्न सुटावा याकरीता अक्कलपाडा पाणीपुरवठा योजना पुर्ण होऊन पुढील आठवड्यात शहराला दिवसाआड पाणी मिळेल, अशी घोषणा सत्ताधारी भाजपाकडुन विद्यमान खा.डॉ. सुभाष भामरे यांच्यावतीने करण्यात आली आहे. मात्र सद्य:स्थितीत गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने धुळेकर जनता आज ना उद्या अक्कलपाडा योजनेचे पाणी मिळेल याच अपेक्षेत आहे. या पार्श्वभूमीवर आज 'धोंडी धोंडी पाणी दे, अक्कलपाडानं पाणी धुळयाले मिळू दे' म्हणत धोंडींची मिरवणूक संबळ वाद्यासह काढण्यात आली. यावेळी मनपा प्रशासन व आयुक्त तसेच भाजपा विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. वरूण राजाला पाऊस पाडण्याचे साकडे घालण्यात आले. सदर मिरवणूक झाशीराणी पुतळा, कराचीवाला खुंट ,आग्रारोड, ग.नं.२ मार्गे नवीन महानगर पालिकेच्या प्रवेशद्वारापर्यंत काढण्यात आली.

याप्रसंगी जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, उपजिल्हाप्रमुख किरण जोंधळे, महानगरप्रमुख धीरज पाटील, डॉ.सुशील महाजन, भरत मोरे , विनोद जगताप, मच्छिंद्र निकम, सुनिल पाटील, सुभाष मराठे,आनंद जावडेकर, अरूण धुमाळ, ज्ञानेश्वर फुलपगारे, हेमाताई हेमाडे, अरूणा मोरे, प्रतिभा सोनवणे, संजय जवराज,भटु गवळी, महादू गवळी,कैलास मराठे, छोटू माळी, सुनिल चौधरी, संजय जगताप, दिनेश पाटील, मुन्नाभाई पठाण, संदीप चौधरी, आदींसह शिवसैनिक उपस्थित होते.

# कोरडा दुष्काळ जाहिर करण्याच्या मागणीसाठी आज रास्ता रोको

**धुळे । प्रतिनिधी**

गेल्या महिण्याभरापासून पावसाने दडी मारल्याने धुळे तालुक्यातील शेतकरी वर्ग संकटात सापडला आहे. पावसाअभावी हातातोंडाशी आलेला घास हिरावला जात असल्याने, धुळे तालुक्यातील शेतकरी बंधू हवलादिल झाली आहेत. तालुक्यात तात्काळ कोरडा दुष्काळ जाहिर करावा, या मागणीसाठी दि.१ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता रास्ता रोको करण्यात येणार आहे. तरवाडे(ता. धुळे) येथे होणार्या चक्का जामची हाक बाळासाहेब भदाणे मित्र परिवाराच्या वतीने देण्यात आली आहे.

धुळे तालुक्यासह जिल्ह्यात यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला. सुरुवातीचे दोन महिने अत्यंल्प पाऊस झालेला असतांनाच, गेल्या महिणाभरापासून पावसाने ओढ दिल्याने पिके करपून गेली आहेत. विहिरींची जलपातळीही मोठ्या प्रमाणात खालावल्याने पिके जगवायची कशी असा प्रश्न शेतकरी बंधूसमोर उभा राहिला आहे. या आंदोलनात बोरी-कनोली परिसरासह तालुक्यातील सर्व सरपंच, उपसरपंच, ग्रा. पं. व विकासोचे पदाधिकारी तसेच सामाजिक, राजकीय आदी क्षेत्रातील पदाधिकार्यांसह शेतकरी बंधूंनी सहभागी व्हावे अशी हाक बाळासाहेब भदाणे मित्र परिवारातर्फे देण्यात आली आहे.

## काश्मीर आणि लोकशाही

जम्मू-काश्मीरला दिलेला खास दर्जा रद्द करण्यासाठी मोदी सरकारने कोणतेही ठाम कारण दिले नव्हते. ती तात्पुरती व्यवस्था होती हे त्यांचे म्हणणे; पण मग राज्याचे विभाजन का केले? जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा मिळू शकेल का? याचे उत्तर सध्या तरी होकारार्थी आहे. कधी? ते मात्र सांगता येत नाही. जम्मू-काश्मीरशी संबंधित ३७० वे कलम रद्द करणे व जम्मू-काश्मीर आणि लडाख हे दोन केंद्रशासित प्रदेश निर्माण करणे यास आव्हान देणारे अर्ज सर्वोच्च न्यायालयासमोर आहेत. घटनापीठापुढे त्यांची सुनावणी सुरु आहे. या संदर्भात या पीठाने केंद्र सरकारला काही प्रश्न विचारले, काही बाबींचा खुलासा मागितला. कदाचित आज केंद्र सरकार त्याचा उलगडा करू शकेल. राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबतीत काही अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झाल्याने जम्मू-काश्मीरचे विभाजन करावे लागले असे केंद्र सरकार न्यायायालयास का सांगत नाही? या प्रदेशास राज्याचा दर्जा पुन्हा बहाल केला जाईल हे केंद्राने न्यायालयास सांगावे अशी अपेक्षा पीठाने व्यक्त केली आहे. केंद्र सरकारची मानसिकता बघता ते कमीपणा घेऊन न्यायालयाचे म्हणणे ऐकेल अशी शक्यता दिसत नाही; पण घटनापीठाची सूचना ही देखील आदेश असल्याने सरकारला काही निवेदन करावे लागेल. याच संदर्भात आणखी एक महत्त्वाचा प्रश्न घटनापीठने केंद्राला केला आहे. जर राज्याचे विभाजन करण्याचे अधिकार केंद्र सरकारकडे असतील तर त्याचा दुरुपयोग होणार नाही याची शाश्वती काय? पंजाब व ईशान्येकडील राज्यांतील परिस्थितीचा हवाला त्यासाठी न्यायालयाने दिला. जम्मू-काश्मीरला ३७०व्या कलमाने दिलेला खास दर्जा व त्या द्वारे त्या राज्यास दिल्या गेलेल्या सवलती हा मुद्दा भारतीय जनता पक्षाची मातृ संस्था रा.स्व. संघास प्रथम पासून अमान्य आहेत. ही जर तात्पुरती व्यवस्था होती तर ती इतक्या प्रदीर्घ काळ का अमलात राहिली हा त्यांचा सवाल आहे. स्वातंत्र्य मिळताना झालेली फाळणी व जम्मू-काश्मीरचा खास दर्जा या दोन्ही बाबींची सांगड संघ व त्यामुळे भाजप घालत आला आहे.भाजपला मोठे बहुमत मिळाल्यावर त्यांनी राज्याला खास दर्जा देणारे ३७० वे कलम रद्द केले. त्याच वेळी राज्याचे विभाजनही केले. त्यास पाच वर्षे झाली. हे विभाजन धार्मिक आधारावर केल्याचा आरोप तेव्हाही झाला. तो केंद्र सरकारने स्पष्टपणे खोडून काढलेला नाही. सर्वोच्च न्यायालयात घटनापीठापुढे सरकारची बाजू मांडताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेत केलेल्या निवेदनाचा हवाला दिला. जेव्हा परिस्थिती सुरळीत होईल तेव्हा जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा परत बहाल केला जाईल, असे ते म्हणाले. राज्यात परिस्थिती सुरळीत झाली आहे हे कोण ठरवणार? हा मोठा प्रश्न आहे. कारण केंद्र सरकारच ते ठरवणार आहे हे उघड आहे. त्यासाठी ते कोणते निकष वापरतील हेही स्पष्ट नाही. ३७० वे कलम रद्द करताना तेथील अनेक नेत्यांना अनेक महिने स्थानबद्ध केले होते, तेथील इंटरनेट सेवा बंद केली होती. जम्मू-काश्मीरमध्ये निवडणूक कधी घेणार हाही प्रश्न घटनापीठाने विचारला आहे. त्याचे लवकर उत्तर मिळणे अवघड दिसते. जुन्या राज्यातून बाहेर काढलेल्या लडाखचा केंद्र शासित प्रदेश हा दर्जा कायम राहील असे मेहता यांनी सूचित केले आहे. त्याचे कारण काय? शेजारी देश फार मैत्रीपूर्ण व्यवहार करत नाहीत, असे मेहता म्हणाले; पण पंजाब हेही सीमावर्ती राज्य आहे. ईशान्येकडील राज्येही सीमेलगत आहेत. राज्यांचे विभाजन करण्याचा अधिकार केंद्र सरकारला दिला तर त्याचा दुरुपयोग होऊन या राज्यांचे विभाजन होणार नाही याची खात्री काय? असे घटनापीठाला विचारायचे आहे. मणिपूरमध्ये आताच कुकी व मैइती समाजातील दुहीमुळे फूट पडली आहे. तेथे दोन स्वतंत्र प्रदेश निर्माण करण्याची मागणी होऊ लागली आहे. छोट्या राज्यांना भाजपचा पाठिंबा आहे, त्यामुळे स्वतंत्र विदर्भाच्या मागणीलाही त्यांचा विरोध नाही हे लक्षात घेतले पाहिजे. जे मतदार आपल्याला अनुकूल आहेत त्यांना एकत्र करण्याचा भाजपचा विचार आहे का? हे देशास कळले पाहिजे. देशाची सुरक्षितता या बरोबरच किंबहुना त्याहीपेक्षा लोकशाहीची पुनर्स्थापना महत्त्वाची आहे असे घटनापीठाने मत व्यक्त केले आहे. त्याचा विचार देशपातळीवर झाला पाहिजे.

# दुष्काळाचे सावट सरकारची गतिमानता

ऑगस्ट महिना संपला. या महिन्यात महाराष्ट्रात काही ठरावीक दिवस आणि ठरावीक भाग वगळता पाऊसच पडला नाही. संपूर्ण ऑगस्ट महिना कोरडा गेला असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. यामुळे जुलै महिन्यात ज्या पावसाने तारले होते, त्याच पावसामुळे ऑगस्ट महिन्यात शेतकऱ्यांना मरणयातना सहन कराव्या लागल्या, अशी भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे. खरं तर गेल्या महिन्यात म्हणजे जुलै महिन्यात चांगला पाऊस बरसला म्हणून अनेक शेतकऱ्यांनी पिकांना वरखते दिली. पेरणी वेळी दिलेल्या खतांमुळे आणि वरखतांमुळे पिकांची जलद गतीने आणि लवकरात लवकर वाढ होईल अशी भोळीभाबडी आशा शेतकऱ्यांना वाटत होती. पण आता शेतकरी आभाळाकडे डोळे वर करून बसला आहे. गेल्या महिन्यात काही भागांत ढगाळ हवामान असल्यामुळे पिकांवर किडीचा प्रादुर्भाव झाल्याने महागड्या फवारण्या देखील केल्या होत्या. मात्र ऑगस्ट महिन्यात पावसाचा मोठा खंड पडला असल्याने महागड्या औषधांचा आणि खतांचा खर्च वाया जाण्याची भीती आता व्यक्त होऊ लागली आहे. सध्या पिकांनी माना टेकल्या आहेत. अनेक भागांतील पिके करपून गेली आहेत.



पुढील काही दिवसांत पाऊस झाला नाही तर पेरणीसाठी केलेला हजारो रुपयांचा खर्च तसेच औषधांचा आणि खतांचा खर्च वाया जाण्याची भीती शेतकऱ्याला आता सतावू लागली आहे, तर काही भागांतील आताच पिके हाताबाहेर गेली आहेत. तर काही ठिकाणी पिकांची राखरांगोळी झाली आहे. ज्या भागात पाऊस नाही तिथे दुष्काळासारखी परिस्थिती पाहायला मिळत आहे. अजूनही राज्यातील धरणांमध्ये पुरेसा पाणीसाठा तयार झालेला नाही. विहिरींत पाणी उतरलेले नाही, अनेक भागांतील विहिरींनी पावसाळ्यात तळ गाठला आहे. अशा परिस्थितीत येत्या काही दिवसांत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न देखील ऐरणीवर येण्याची शक्यता नाकारत येत नाही.

जनावरांच्या चाऱ्यासाठी आणि पाण्यासाठी देखील शेतकऱ्यांना वण-वण भटकावे लागणार आहे, हे कदाचित पुढील काळातील विदारक चित्र असू शकते. त्यामुळे, आता बाकी राहिलेल्या मान्सूनच्या दीड महिन्यांच्या काळात तरी चांगला पाऊस पडावा, अशी शेतकऱ्यांची इच्छा आहे. अशातच पुढील तीन-चार दिवसांत राज्यात हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. नवीन हवामान अंदाजानुसार, राज्यातील पश्चिम महाराष्ट्र विभागातील अहमदनगर, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर या सहा जिल्ह्यांत २ सप्टेंबरपर्यंत हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. या संबंधित भागात ०.५ ते १.५ मिमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसेच, कोकण विभागातील सिधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, पालघर या जिल्ह्यांत देखील हलका पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच मराठवाडा विभागातील धाराशिव, हिंगोली, बीड, संभाजी नगर, जालना, परभणी आणि नांदेड या जिल्ह्यांमध्येही हलका पाऊस पडणार असा अंदाज नुकताच वर्तवला आहे. या अंदाजानुसार राज्यात नजीकच्या काळात कुठेच मुसळधार पाऊस पडणार नाही असे यावरून स्पष्ट होत आहे.

पाणीटंचाई, दुष्काळ हे चित्र महाराष्ट्रासाठी नवे नाही.राज्याला १९७२च्या दुष्काळाने होरपळून टाकले. त्यानंतर तब्बल ४० वर्षे मोठा, जवळपास संपूर्ण राज्याला कवेत घेणारा दुष्काळ पडला नव्हता. ढोबळमानाने मराठवाड्यातील आठ जिल्हे, नगर, सोलापूर, पश्चिम विदर्भासह सातारा, सांगली, पुणे जिल्ह्यांचा काही भाग दुष्काळी पट्ट्यात, अर्थात पर्जन्यछायेत येतो. १९७२ नंतर राज्यातील या पट्ट्यातील काही भागांत पाणीटंचाईची स्थिती निर्माण होत असे, मात्र या संपूर्ण पट्ट्याला एकाचवेळी अवर्षणाची स्थिती निर्माण होत नसे. त्यामुळे मोठ्या दुष्काळाशी दोन हात करण्याची वेळ महाराष्ट्रावर १९७२ नंतर आली नव्हती. त्यानंतर २०१२ मध्ये, सन २०१५ आणि सन २०१८ मध्ये महाराष्ट्राकडे पावसाने पाठ फिरविली.

राज्यातील बहुताश भागांत सरासरीपेक्षा कमी पाऊस पडला. १९७२ मध्ये पावसातील तूट ३२ टक्क्यांपासून ५७ टक्क्यांपर्यंत होती. २०१२ मध्ये राज्यात वार्षिक सरासरीच्या ८९ टक्के पाऊस पडला. मात्र विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्राचा काही भाग आदी ठिकाणी पावसाचे प्रमाण कमी होते. हा दुष्काळ महाराष्ट्राबरोबर मध्य प्रदेश, गुजरात, तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू या राज्यांनीही अनुभवला. त्यानंतर २०१५ मध्येही पावसाने पाठ फिरविली. राज्यातील २३ जिल्ह्यांत सरासरीपेक्षा कमी पाऊस पडला आणि मोठ्या दुष्काळाचा सामना करावा लागता होता.

दुष्काळग्रस्त स्थितीचा अंदाज राज्य सरकारला आल्यानंतर महाराष्ट्रातील कोणत्याही भागातील शेतकरी अडचणीत असेल तर त्याला तत्काळ मदत व्हावी यासाठी वॉर रूम निर्माण करत आहेत; परंतु त्याचबरोबर जनतेला कशी मदत मिळेल याचा विचार करायला हवा. संकटाच्या परिस्थितीत लोकांना जगवले पाहिजे. त्यांना कामे दिली पाहिजेत. पशुधन वाचवले पाहिजे. पशुधनासाठी चारा दिला पाहिजे. शेतकऱ्यांना गाई, म्हशी पुरवल्या पाहिजेत. त्यानंतर पिण्याचे पाणी पुरवले पाहिजे. शेतकरी आणि कष्टकऱ्यांकडून जी वित्तीय संस्थांकडून वसुली केली जाते, त्याला माफी दिली पाहिजे. कर्जातून सूट दिली पाहिजे. कर्जाचे दीर्घ हप्ते केले पाहिजेत. हे सर्व करायला हवे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मंत्रालयात वॉर रूम उभारण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केलीच आहे. आता गतिमान पावले उचलणे महत्त्वाचे आहे.

## नारी शक्तीचा गौरव

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या 'मन की बात'मध्ये नारी शक्तीचा गौरव केला. त्यांनी सांगितले की, चांद्रयान मोहिमेमुळे भारताचा जगात गौरव झाला आणि तो गौरव नारी शक्तीमुळेच भारताला लाभला. जेव्हा नारी शक्तीचे अधिष्ठान असते तेव्हा कोणताही कार्यक्रम, मिशन यशस्वी होतेच, हे जगमान्य झालेले सत्यच तर मोदी यांनी सांगितले. चांद्रयान मोहिमेत सहभागी झालेल्या पथकात कित्येक स्त्रिया, महिला अभियंता वगैरे होत्या. त्याचा गौरवपूर्वक उल्लेख मोदी यांनी करून भारत नारी शक्तीला किती आदर देतो, हेच अधोरेखित केले. भारतात प्रथमपासून नारी शक्तीचा गौरव केला जात आहे. अगदी पुरातन काळात जायचे म्हटले तर गार्गी, मैत्रेयी यांनी शंकराचार्यांना वादात हरवले होते, तर अकबराच्या दरबारात प्रसिद्ध असलेला गायक तानसेन याची मुलगी ताना रिरीने त्याला साथ देऊन बादशहाच्या गैरमर्जीपासून वाचवले होते. अशी कितीतरी उदाहरणं देता येतील की महिलांनी पुढे येऊन भारताची शान वाढवली आहे.

भारतीय हवाई दलात तर आता महिलांना प्रवेश मिळाला आहे. पण तेथेही महिलांनी जोरदार कामगिरी करून देशाच्या हवाई दलाची प्रतिष्ठा वाढवली आहे.आपल्याकडे महिलांना सन्मानाने वागवण्यात येत आहे, त्याची किती उदाहरणे म्हणून सांगावीत. इंग्लंडमध्ये देखील महिलांना मताधिकारासाठी झगडावे लागले होते. आपल्याकडे बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या द्रष्ट्या नेत्यामुळे महिलांना सुरुवातीपासून मताधिकार प्राप्त झाला होता. इतकेच नव्हे तर सर्व मतांचे मूल्य समान ठेवण्याचे अभिमानास्पद कामही बाबासाहेबांनी केले. ही जी परंपरा आहे तिचेच उदात्तीकरण मोदी यांच्या परवाच्या 'मन की बात'मध्ये दिसले. त्यांनी चांद्रयानच्या यशात महिलांचा वाटा असल्याचे आवर्जून सांगितले. मोदी यांनी चांद्रयान मोहिमेला बळ तर दिलेच आणि प्रेरणाही दिली. पण मोदी यांनीच नारी शक्तीचा गौरव केल्याने आता स्त्रियाही विज्ञान शाखेकडे मोठ्या संख्येने वळतील. महिला या विज्ञानात मागे नसतात, हा फार मोठा संदेश मोदी यांनी नारी शक्तीचा गौरव करून दिला आहे. ज्या देशात पूर्वी महिलांवर पुरुष वर्गाकडून प्रचंड अत्याचार झाले, त्या वर्गात महिलांची स्थिती आता किती कमालीची सुधारली आहे, हे पाहून स्तिमित व्हायला होते. महिलांच्या विद्रूपीकरणाची कुप्रथा कधीच थांबली. पण त्यानंतरही महिलांचा सन्मान करून त्यांना त्यांच्या कार्याचे योग्य श्रेय देण्याची वहिवाट भारतात चालत आली आहे. मोदी यांनी नारी शक्तीचा जो गौरव केला, त्यामागे ही फार मोठी परंपरा आहे. त्याच परंपरेचे पाईक मोदी आहेत.

विरोधक केवळ आपण फार मोठे स्त्री शक्तीचा गौरव करणारे आहोत, असे सांगत असतात. पण काँग्रेसच्या काळात स्त्रियांवर अनेक अत्याचार करण्यात आले. दिल्लीतील निर्भयाप्रकरण तर अगदी अलीकडचे. पण तेव्हा दिल्लीत मनमोहन सरकार होते. ते लेचेपेचे नसते तर गुन्हेगारांची असले क्रौर्य दाखवण्याची हिंमतच झाली नसती. दिल्लीला आता तर रेप कॅपिटल म्हणून ओळखले जाते. हे पाप दिल्लीतील अरविंद केजरीवाल आणि काँग्रेसच्या पूर्वीच्या सरकारांचे आहे. केवळ विरोधकांना दोष देण्यासाठी हे विवेचन केले नाही, तर वस्तुस्थिती सांगितली आहे. अजूनही तालिबानी मानसिकतेत काँग्रेस आहे. दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांनी शाहबानो प्रकरणात अल्पसंख्याक पुरुषांना खूश करण्यासाठी चक्क सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय फिरवला. तो निश्चितच नारी शक्तीचा गौरव नव्हता, तर नारी शक्तीला दाबणे होते. तेच काम मोदी यांनी तिहेरी तलाकची कुप्रथा बंद करून नव्याने नारी शक्तीला प्रोत्साहन दिले. केवळ हिंदू स्त्रीचाच नव्हे तर अल्पसंख्याक समाजातील महिलांचा आपण आदर करतो, हे मोदींनी कसलीही बडबड न करता दाखवून दिले. आजही काँग्रेसवाले मात्र अल्पसंख्याक नाराज होऊ नयेत म्हणून तिहेरी तलाकची कुप्रथा बंद करून का संकटातून अल्पसंख्याक महिलांची सुटका केली म्हणून मोदी यांच्यावर आगपाखड करत असतात. नारी शक्तीचा आविष्कार प्रत्येक बाबतीत आज देशात दिसतो आहे. आज महिला किती मनमोकळेपणाने वावरत असतात. बैठकांमध्ये महिला अधिकारारूढ होऊन चर्चा करत असतात. हे चित्र दिसेल, असे पन्नास वर्षांपूर्वी कुणी कल्पना तरी केली असेल काय? त्याचे उत्तर नाही असे आहे. नारी शक्ती आज सर्वत्र नवीन झेंडे गाडत आहे. चंद्रावरही याच नारी शक्तीने झेंडा रोवला आहे. महिलांचा गौरव करतानाच पंतप्रधान मोदी यांनी नेहमीप्रमाणे आपली खेळात असलेली रुचीही दाखवली. विद्यापीठ स्पर्धेत गौरवशाली ठरलेल्या महिला खेळाडूंशी त्यांनी संवाद साधला आणि क्रीडा क्षेत्र किती महत्त्वाचे आहे, हेच दाखवून दिले. त्याबाबतही मोदी यांचे आभार क्रीडाप्रेमी देशाने मानले पाहिजेत.

## शब्दकोडे-१६६



आडवे शब्द -

१. करमणूक करणारे ४. चाणक्यनीती १०. आरक्षित ११. मुसळधार पावसाचे नक्षत्र १२. पक्षीराज १३. चांदी १५. टक्कर १७. केशतेलातील सुगंधी वनस्पती १८. हार, सर २१. इतरांहून निराळी २३. अनेक प्रकारची फळे २६. फळांचे शेत २७. भांडण २८. कमीजबरोबरचे वस्त्र ३०. रेशमाचे जाडसर कापड ३२. स्वच्छ कारभार! ३४. नमन ३५. विशेष ३६. दयाळू ३७. निरर्थक ३९. पळून जाणे ४१. खाजणारा ४२. ओढ्यावरील तात्पुरता पूल ४४. भूतकाळ ४६. अत्तराचा बोळा ४८. अधिक महिना ५१. नृत्य-नाट्यकलेचे दैवत ५४. निराश, अनुत्साही ५५. नेम, व्रत ५७. उत्सवाचे दिवस ५८. पुष्कळ (ग्रा.) ५९. नमुनेदार ६२. ताबा, बळजबरीने अंमल ६३. दुसऱ्याच्या अंमलाखाली असलेला ६४. लहान मूल ६५. भोळा शंकर ६७. हिंमत ६९. किंचित वक्रता ७०. वेतन ७१. बातमी ७२. चिंतन ७३. आणि ७४. उद्देश, नेम ७५. हिंदीत पोस्ट ऑफिस

उभे शब्द -

१. सुंदर स्त्री २. रंगविलेले ३. भयानक, भयंकर ४. दक्ष ५. जळजळीत, उष्ण ६. झकास ७. वाघाची ललकारी ८. मेहनत, श्रम, त्रास ९. बटबटीत, आगखाऊ १४. त्रागा, राग, संतापणे १६. एक छोटे चर्मवाद्य १७. पत्ता, शोध १९. मराठीत 'सॉरी'! २०. निकट, आजूबाजूस २२. गतिमान २४. दाखविणे २५. मनातील इच्छा, बेत २७. वाद्य वाजविणारा २९. रम्य ३१. सज्जनगडचे संत ३३. सैनिकांची परेड, व्यायाम ३५. आचारी ३७. बकरा, बोकड ३८. प्राण ३९. सैन्याची तुकडी ४०. फायदा ४१. गैरहजेरी, कामावर बुट्टी ४३. तापापूर्वीचे अंग मोडून येणे ४५. लोखंड घासण्याचे हत्यार ४७. वेदना ४९. फोडातील द्रव ५०. हांजी हांजी करणारे वरिष्ठांनी 'बैल गाभणा' म्हटल्यावर '--- महिना' म्हणण्यास मागेपुढे पाहत नाहीत! ५२. पोपट ५३. चकचकीत ५४. प्रसिद्ध शायर- --- खय्याम ५६. शिर्डीचे संत ५९. सन्मानाचे वेतन ६०. गोष्टी लिहिणारा ६१. आवाजांचा गोंधळ ६३. उद्याच्या नंतरचा दिवस ६५. मूळ बांधकाम ६६. आघात, घाव ६८. अंतःकरण

### शब्दकोडे १६५ चे उत्तर

**आडवे उत्तर -**
१.नारा ३.भारतरत्न ६.मखलाशी ९.खान ११.रस १२.सदन १३.विशाल १४.रग १५.दगडी १८.पल १९.आजोळ २०.रम २१.कर्जबाजारी २२.बार २३.अंबा २४.तपोबल २६.मदन २९.ईर ३१.मादक ३३.गारवा ३५.पेठा ३८.दलाल ४१.वटवट ४३.सुरवंट ४४.म्यान ४५.लवकर ४७.वदन ४८.अवधान ५०.कमालकिमान ५३.टर ५५.पाचक ५६.रान ५७.कास ५९.वासर ६०.माल ६१.रिक्षा ६२.परत परत ६५.जनमत ६७.पत्रक ६८.लता ७०.आग ७१.नजरानजर ७२.महानगरपालिका ७६.काम ७७.झालर ७८.नत ७९.कालगती

**उभे**
१.नारद २.रासगरबा ३.भास ४.रदनक ५.तन ६.मशाल ७.खल ८.शिरजोर ९.खार १०.नगरसेवक १३.विपरीत १६.डीम १७.अंबाबाई १९.आबाल २३.अंतर्नाद २५.पोर २७.दगा २८.नरवर ३०.रपेट ३२.दरम्यान ३४.वाट ३६.क्षार ३७.अलबत ३९.संगोपन ४०.लव ४२.वर्तमानपत्र ४३.सुरमा ४६.करकरीत ४८.दरवाजा ५०.करा ५१.किस्मत ५२.नकार ५४.नरमगरम ५८.सतलज ६०.माजघर ६३.रकमपात ६४.पद ६६.मलमल ६७.पलंग ६९.तारामती ७०.आजकाल ७३.हार ७४.रन ७५.काका



## सोभाव (सुत्र ४)
## सोभाव आनी मन

मानूस जनमले येताच त्यानं सोतान एक वातावरन आनी परिसर या गोष्टी आपोआप त्याले मियत -हातीस.त्याना मनमा बीजभाव हाऊ त्यानाच देहधर्म, प्रकृती, प्राप्त वातावरन, परिसर आनी सोतानी जानीव अस्मिता ह्यामाईन परिपाक रुप प्रगट व्हत -हास.ज्या गोष्टीमाथून मनमा जनम व्हस त्याच गोष्टीसना पन परिनाम मनवर बी व्हत -हास.पुढे मन विरूद्ध ते जसजसं मोठं मोठं व्हत जास तसतसं त्यानावर मोठाल्ला आघात प्रत्याघात व्हत -हातस तस ते बनत जास.आस म्हनतस की साधारनपने त्याले पाचवा सहावा महिना पासून या गोष्टीसले सुरवात व्हस.आनी पुढे हाऊ क्रम त्याना मरेपर्यंत चालूस -हास. ज्या परमाने सूर्य आनी त्याना परकासकिरन -हातस त्याचपरमाने सोतानी जानीव अस्मिता आनी मन सेतू. ह्यापरमाने मन हायीकायी जनमले येताबरोबर जनमले येत नै. ते जनमले येवानंतर दोन -तीन महिनामा जनमले येस.आनी मन जनमले ऊनं म्हन्जे मानूसना जनमले खरा अर्थातून जनम व्हस.मूल जनमले पयले येस तो फक्त त्याना देहधर्म हाऊच -हास. ते बी त्याले ठाऊक -हात नै. त्यानी त्याले पयली वयख हाई त्याले समयनारी दाई नै ते त्यानी जनमदाती मार्च त्याना देहधर्मनी वयख करी देस. या साध्या गोष्टीसपासून पुढला मानूस निरमान व्हस. हाईच खरी गोष्ट त्याना पुढला जीवनमातली महत्वानी बाब -हास. आठे तो सोता काहीच करत नै. म्हनीसन त्याना पुढला आयुष्यमा मायनी खरी पुन्यायी मोजाई जास. सुशिलो मातृपुन्येन असा पक्का आपलाकडे समज शे. पन त्यानी खरी गोम ह्या साध्या गोष्टीसमा शेत.या समद्या गोष्टी, परिस्थिती आनी मुलन मन ह्या आघात प्रत्याघातना क्रम सुरू व्हवामाच आपून ज्याले सोभाव म्हनतस तोच त्याना बीजभाव नक्की व्हत -हास. त्यायेयनी परिस्थितीना होनारा परिनाम त्यानामनवर सतत व्हत -हास.आनी त्यान मन आपला मगदूरपरमाने परिस्थितीवर करत -हास जसं मूल एकदा रडाले लागन ते जो पर्यंत त्याले कोनी उचलत नै तोपावेतो ते सारखं रडतच -हास. त्याले उचललं, आंगशे धर की मंग त्यानंरडनं थांबस.अशा त्यानामनवर आघात प्रत्याघातना सतत चालू च -हातस. आनी त्यामुये त्याना मनथाईन बी त्यानावर होनारा प्रत्याघातबी एकच प्रकारांनी व्हतसच -हातस. या सतत चालू -हातस. ह्यानीच त्याले मंग सवय लागस.अशा चांगल्या वाईट सवयीसमाथूनच मानूस सोभावना बालदेह घडत जास.पुढे त्याच सवयी लागतीस तस त्यान मन बी घडस आनी त्याले त्याना शरीरन्या हालचालीस म्हाईन तो घडत जास. ह्याच पयले पासून त्याना अवस्थामा सवयी लागतीस. तोच खरा हाऊ पयला काय हाईच पयले पालकन ध्यानमा येवाले जोयजे व्हत. पयले मनन्या सवयीसपरमाने शरीरले प्रेरना मियस. पुढे शरीरन्या सवयी मनले प्रेरना देऊ लागतीस.ह्या अशा परस्परले साथ देवांना भाव निरमान व्हत जास त्याच भआवमआईन पुढे स्थायी-पक्की अशी जी घडन व्हस तीच त्या घडीले त्याना सोभाव बनाडस असं आपून मंग बोलाले लागतस. प. पू.डॉ.रामचंद्र महाराज पारनेरकर.यासना स्वभाव या ग्रंथाचे पन्नास सुत्रांचे अहिरानी भाषेत अनुवाद केला.

**- प्रा.भगवान पाटील. अध्यक्ष, अहिरानी साहित्य परिषद धुळे**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

## न्यूज कॉलम

### रोटरी नाईन हिल्सतर्फे रविवारी डॉ.महेश करंदीकर यांचे व्याख्यान

**नाशिक ।** रोटरी क्लब ऑफ नाशिक नाईन हिल्स आणि सार्वजनिक वाचनालय, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि.३ सप्टेंबरला औरंगाबादकर सभागृहात सायंकाळी ६.३० वाजता विख्यात मेंदू व मज्जारज्जू विकार तज्ज्ञ डॉ. महेश करंदीकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. अशी माहिती क्लबचे अध्यक्ष प्रकाश ब्राह्मणकर, प्रकल्प संयोजक विश्वास शिंपी आणि नरेन्द्र शाळीग्राम यांनी दिली. २०२३-२४ या वर्षात रोटरीने 'मानसिक स्वास्थ्य आणि आरोग्य' या संकल्पनेवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. विविध व्यवसायातील ताण-तणावांचे नियोजन करणे, त्यात सुधारणा घडवून आणणे यावर रोटरीचा भर आहे. येत्या ३ सप्टेंबरच्या व्याख्यानात डॉ. महेश करंदीकर त्याच विषयाला अनुसरून 'मानसिक आरोग्य आणि जीवनशैली'' यावर मार्गदर्शन करणार आहेत. सर्वांनी त्यांच्या व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही ब्राम्हणकर, शिंपी आणि शाळीग्राम यांनी केले आहे.

# पत्रकारांना संरक्षण देण्यासाठी सरकारने कठोर कायदे करण्याची गरज : अण्णा हजारे

**नाशिक । प्रतिनिधी**



पत्रकार हा सुध्दा एक समाजसेवक असून तो समाज मनाचा आरसा आहे. आज पत्रकारांवरच हल्ले होताना दिसत आहेत. लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर असे हल्ले होत असतील तर हा देश, हे राज्य सुरक्षित कसे राहणार? असा सवाल अण्णा हजारे यांनी केला आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ जर सुरक्षित असेल तरच लोकशाही सुरक्षित राहील. पत्रकारांना संरक्षण देण्यासाठी राज्य व केंद्र सरकारने विधीमंडळ तसेच संसदेत कठोर कायदे संमत करून घेण्याची गरज असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे यांनी व्यक्त केले आहे. राळेगण सिद्धी येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ पारनेर यांचे वतीने समाजातील विविध गुणवंतांचा सन्मान, पत्रकारांना रेनकोट व ओळखपत्रांचे वाटप करण्यात आले. यावेळी जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे बोलत होते.

यावेळी हजारे तसेच राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सचिव डॉ.विश्वासराव आरोटे यांच्या अध्यक्षतेखाली सर्व पत्रकार बांधवांना रेनकोट, ओळखपत्र व वृक्षभेट देण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन राज्य पत्रकार संघाचे अहमदनगर जिल्हाध्यक्ष दत्ता पाचपुते, राज्य पत्रकार संघाचे अहमदनगर जिल्हा सचिव व शिवसंवाद न्युजचे संपादक गाडगे उपस्थित होते. यावेळी डॉ.विश्वासराव आरोटे, दत्ता पाचपुते, दत्ता गाडगे आदी मान्यवरांसह प्राथमिक शिक्षक आनंदा झरेकर, तुकाराम आडसुळ, केंद्रिय पोलीस दलाचे उपनिरीक्षक तुषार ढवण, लोकशाहीर दत्ता करंदीकर, नुतन चौधरी, लोककलावंत मनिषा चव्हाण आदी विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मानचिन्ह तसेच शाल, श्रीफळ, बुके देवून सन्मानित करण्यात आले. हजारे यावेळी म्हणाले राज्य पत्रकार संघाचे प्रदेश अध्यक्ष वसंत मुंढे,मुख्य संघटक संजयजी भोकरे, सचिव डॉ. विश्वासराव आरोटे यांनी राज्यातील ग्रामीण भागातील पत्रकारांना संघटीत करत अनेक सामाजिक उपक्रम राबवून पत्रकारांना न्याय देण्याचे पवित्र कार्य केले. झोपलेल्या सरकारला नेहमी जागे राहण्यास भाग पाडले. पत्रकारीता करत असताना नियमीत सेवाभाव जपण्याचे काम त्यांनी केले आहे.

राज्यातील ग्रामिण व शहरी भागात मोठ्या प्रमाणावर पत्रकारांवर हल्ले होत आहेत. झोपलेल्या सरकारला हे कधी कळणार? लोकशाहीचा चौथा स्तंभ धोक्यात आला, लोकशाहीवरच हा हल्ला असून सरकारने या गोष्टीकडे गांभीर्याने पहायला हवे. यासाठी राज्य व केंद्र सरकारने विधीमंडळ आणि संसदेत पत्रकारांना संरक्षण देण्यासाठी कठोर कायद्याची निर्मीती करावी अशी मागणी अण्णा हजारे यांनी सरकारला केली. यावेळी बोलताना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सचिव डॉ. विश्वासराव आरोटे म्हणाले, अण्णांनी माहितीचा अधिकार ही देशाला दिलेली देणगी आहे.

याप्रसंगी राज्य पत्रकार संघाचे श्रीगोंदा तालुका तालुकाध्यक्ष शिंदे, सचिव पिटर, पारनेर तालुका उपाध्यक्ष सुरेश खोसेपाटील, रामदास नरड, अविनाश भांबरे, खजिनदार संतोष कोरडे, पारनेर शहराध्यक्ष संतोष तांबे, निघोज शहराध्यक्ष सागर आतकर, मायभूमीचे कार्यकारी संपादक महेश शिंगोटे, पत्रकार वसंत रांधवन, संपत कपाळे, गंगा धावडे, आनंदा भुकन, संपत वैरागर, संदीप गाडे, अनिल चौधरी, भगवान मंदिलकर, नितीन परंडवाल, सचिन जाधव आदींसह पत्रकार बांधव मोठ्या संख्येने हजर होते. प्रास्ताविकात तालुकाध्यक्ष विनोद गायकवाड यांनी संघटनेच्या कार्याचा धावता आढावा घेतला. सूत्रसंचालन कार्याध्यक्ष संजय मोरे यांनी तर आभार सचिव बाबाजी वाघमारे यांनी आभार मानले.

# रक्षाबंधन सर्वात मोठी पवित्रतेची निशाणी : ब्रह्माकुमारी वासंती दीदी



### ब्रह्माकुमारीमध्ये रक्षाबंधननिमित्ताने स्नेहमिलन कार्यक्रम संपन्न

**नाशिक । प्रतिनिधी**

रक्षाबंधनाचे आध्यात्मिक रहस्य सांगताना यादिवशी बहीण सर्वप्रथम आपल्या भावाला तिलक लावते. तिलक लावणे म्हणजे आपल्या पवित्र अवस्थेत स्थिर राहणे. तोंडातून कधीही कडवट बोलू नका. राखी बांधणे म्हणजे पवित्रतेचे व्रत घेणे म्हणजे मनाने आणि शब्दाने शुभ गोष्टींचा विचार करणे आहे. असे सांगत आजच्या युगात समाजातील असणाऱ्या दृष्ट आणि वाईट प्रवृत्तींचा समूळ नष्ट करण्यासाठी रक्षाबंधनचे महत्व समजावून घ्यावे. रक्षाबंधन सर्वात मोठी पवित्रतेची मोठी निशाणी असून व्यक्तीची स्मृती, स्थिती, तन, मन, वचन, कर्म इत्यादी शुद्ध पवित्र व श्रेष्ठ कसे असावे याबाबतचे सर्व शिक्षण येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरी विश्वविद्यालयामार्फत दिले जाते. असे प्रतिपादन संस्थेच्या जिल्हा मुख्य संचालिका राजयोगिनी ब्रह्माकुमारी वासंती दीदी यांनी केले.

म्हसरूळ येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या नाशिक जिल्हा सेवा केंद्राच्यावतीने रक्षाबंधनानिमित्ताने स्नेह मिलन कार्यक्रमाप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष पंढरीनाथ थोरे, मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ड. नितीन ठाकरे, माजी आमदार अनिल कदम, माजी नगरसेवक अरुण पवार, पुस्तकांचे हॉटेल संचालिका जोंधळे, सामाजिक कार्यकर्ते प्रवीण जाधव, सागर कंट्रक्शनचे भास्करशेठ सोनवणे, साधना केअरचे डॉ. उल्हास कुटे, निफाड तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे माजी अध्यक्ष संजय बोडके, दै. देशदूतचे उपसंपादक नरेंद्र जोशी, दै. लक्ष महाराष्ट्रचे अजय भोसले, साप्ताहिक आपला आवाजचे संपादक अमोल सोनवणे आदींसह मोठ्या संख्येने सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सहकार, पत्रकार, कृषी क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

> **ब्रह्माकुमारी संस्थेचे अध्यात्मिक कार्य अतिशय उल्लेखनीय असून करोनाच्या प्रादुर्भावामुळे विद्यार्थ्यांचे फार मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची प्रवृत्ती राहिली नाही. रागावर नियंत्रण नाही. म्हणून परिपाठाच्यावेळी एक तास विद्यार्थ्यांना आपल्या संस्थेच्यावतीने अध्यात्मिक मार्गाद्वारे ध्यानधारणेचे महत्त्व पटवून द्यावेत असे आवाहन आहे. – पंढरीनाथ थोरे,** अध्यक्ष क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण संस्था, नाशिक

कार्यक्रमाचे स्वागत-प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन राजयोगिनी ब्रह्माकुमारी पूनम दीदी यांनी केले. यावेळी सर्व मान्यवरांसह उपस्थित बंधू भगिनींना दिदींनी तिलक लावून राखी बांधली. यावेळी राजयोगिनी ब्रह्माकुमारी विना दिदी, मनीषा दिदी, पुष्पा दीदी, मंगल दीदी, ज्योती दीदी, सुरेश साळुंखे, दिव्यांग संघटनेचे नाशिक विभागीय अध्यक्ष बाळासाहेब सोनवणे, विकास भाई, राजन भाई, मनोहर भाई, वसंत बाविस्कर, दिलीप काठे, डॉ.आव्हाड, कस्तुभ भाई,साहेबराव अण्णा, मंगेश सौंदाणे, विनोदकुमार जैन, जयवंत महाले, विपुल भाई, निखिल भाई, पंकज भाई आदींसह मोठ्या संख्येने साधक तसेच सेवेकरी बंधू-भगिनी उपस्थित होते. यावेळी सर्वांचे आभार त्र्यंबकेश्वर येथील सेवा केंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी मंगल दिदी यांनी मानले.

# नवीन नाशिक ब्लॉक कॉँग्रेसतर्फे जनसंवाद यात्रेच्या नियोजनाची बैठक संपन्न

**नाशिक । प्रतिनिधी**

राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेच्या पार्श्वभूमीवर अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या आदेशानुसार तसेच महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस अध्यक्ष नानासाहेब पटोले यांच्या सूचनेनुसार संपूर्ण महाराष्ट्रात जनसंपर्क यात्रेचे नियोजन कॉंग्रेस विधिमंडळ गटनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली नियोजन करण्यात आलेले आहे.

दि. ३ सप्टेंबर ते १२ सप्टेंबर या दरम्यान संपूर्ण महाराष्ट्रात या यात्रा निघणार आहे. पश्चिम विधानसभा मतदारसंघात या यात्रेचे नियोजन दि. ४ सप्टेंबर रोजी सायंकाळी चार वाजता करण्यात येणार असून त्यासंदर्भात नियोजन करण्यासाठी नवीन नाशिक ब्लॉक कॉंग्रेसतर्फे बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यात पाथर्डी फाटा येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास हार घालून तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून यात्रा सुरुवात करण्यात येणार असून उत्तमनगर, पवननगरमार्गे यात्रा त्रिमूर्ती चौक येथे पोहचणार आहे.

दरम्यान यावेळी रस्त्यात विविध समस्यांबाबत नागरिकांशी संवाद साधून निवेदन स्वीकारले जाणार आहेत. त्याप्रमाणे असे नियोजन करण्यात आलेले आहे. या बैठकीत माजी नगरसेवक केशवराव पाटील, लक्ष्मण जायभावे, वंदना पाटील, अमोल साळवे, सुभाष पाटील, अशोक लहामगे, गणेश पाटील, शत्रुघ्न कदम, धोंडीराम बोडके, देवेंद्र देशपांडे, इमरान अन्सारी, पप्पू निकम, सचिन गायकवाड, सुमित सोनवणे, संतोष राऊत, अशोक खोडे, अर्जुन देवरे आदी उपस्थित होते.

# महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे गटशिक्षण अधिकाऱ्यांना निवेदन

**चिमठाणे । प्रतिनिधी**



शिंदखेडा तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेची पाहणी करण्यात यावी व शिक्षणाचा विचाराची अमल बजावणी व्हावी. अश्या विविध मागणीचे निवेदन गट शिक्षण अधिकारी यांना देण्यात आले.

एकी कडे शिकाल तर टिकाल ची मोहिम राबवली तर दुसरी कडे मात्र प्राथमिक शाळेकडे दुर्लक्ष करत आहेत. गरीब सर्वसामान्य व शेतकरी कुटुंबातील मूल हे आपली आर्थिक परिस्थिती खाजगी शाळेत शिक्षण घेण्याची नाही. या कारणास्तव शासनाने सर्व सामान्य व गरिबांसाठी शिक्षणाचा पाया शक्षम करण्यासाठी ज़िल्हा परिषद प्राथमिक शाळा सुरु करण्यात आले. परंतु शिंदखेडा तालुक्यातील कोळदे येथील जि. प. शाळेत ऐकून वर्ग चार असून विध्यार्थी संख्या ५४ असून वर्ग चार मुलाची संख्या ५४ मात्र गुरुजी एक आहे. शाळेत मुलांना पिण्याचे पाणी व टाकी देखील नाही. शाळेत व परिसरात घाणीचे साम्राज्य सफाई कर्मचारी असून देखील मुलांकडून साफ सफाई ही केली जाते असे दिसून आले तर ज्या वयात शिक्षणाचा पाया ही भक्कम होऊ शकत नाही. बालकांना मोफत शिक्षण हा कायदा आगस्ट २००९ रोजी कायदा लागू करण्यात यावा.भारतीय राज्यघटना कलम २१(अ) अंतर्गत सहा ते चौदा वयोगटातील मुलांना मोफत शिक्षण आणि सक्तीचे शिक्षणा विषयी वर्णन केले आहे.

यावेळी शाळां विषयी तिथल्या परिस्थिती कडे लक्ष केंद्रित करून त्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक अधिकारांचे श्वसन कश्या प्रकारे होत आहे. त्यांना शैक्षणिक अधिकारा पासून त्यांना कशे वंचित ठेवले जात आहे.या सर्व गोष्टींची सविस्तर मांडणी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे शिंदखेडा शहर अध्यक्ष स्वामी सोनवने यांनी केली. शाळेत स्वछता गृह नाहीत पिण्याच्या पाण्याची सोय नाही साधा नळ सुद्धा नाही. व विद्यार्थ्यांनी स्वतः शाळेत सफाई करताना चे विडिओ या सर्व बाबी पुराव्याच्या स्वरूपात तालुका उपाध्यक्ष विरपाल गिरासे यांनी सादर केले. तालुका अध्यक्ष मोंटी धनगर यांच्या नेतृत्वात देण्यात आले. यावेळी मोंटी धनगर, तालुका अध्यक्ष शिंदखेडा स्वामी सोनवणे, शिंदखेडा शहर आध्यक्ष विरपाल गिरासे, शिंदखेडा तालुका उपाध्यक्ष कृष्णा देसले, मनविसे शहर संघटक शिंदखेडा धर्मेश माळी, मानवीसे शहर उपाध्यक्ष शिंदखेडा जयेश महाजन, महाराष्ट्र नवनिर्माण सेना सोशल मीडिया विभाग कुलदीप गिरासे, हितेश बोरसे, विघ्नेश पाटील, प्रणव विसपुते, ओम माळी आदी उपस्थित होते.

# लासलगाव येथील महादेव मंदिरात पावसासाठी पर्जन्ययज्ञ

**लासलगाव । प्रतिनिधी**



अनियमित पावसामुळे बळीराजा तर हैराण आहेच परंतु आता सर्वसामान्यांच्या पिण्याच्या पाण्या सोबतच मुक्या जनावरांच्या चारापाण्याचाही प्रश्न निर्माण होणार आहे.दुष्काळाचे संकट दूर होऊ दे ! मुबलक पाऊस पडू दे! या मागणीसाठी लासलगाव येथील महादेव मंदिरात श्रावण महिन्यात दरवर्षी शिवभक्त मंडळाकडुन होणाऱ्या नित्य अभिषेक प्रसंगी विशेष संकल्पाव्दारे पर्जन्याला आवाहन करण्यासाठी पर्जन्ययज्ञ सुरू आहे

लासलगाव येथील पुरातन महादेव मंदिरात श्रावण महिन्यात पहाटे अभिषेकाची परंपरा सुमारे १५० वर्षांपेक्षा जास्त जुनी असून परंपरागत संकल्पात यंदा पर्जन्यवृष्टी साठी पुरोहित विजय जोशी गुरू व नंदकिशोर भंडारी गुरू यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष संकल्प द्वारे रोज पर्जन्ययज्ञ (पावसासाठीचा यज्ञ) करण्यात येत आहे. सकलजनांचे कल्याण व्हावे हा हेतु ठेवुन,पाऊस पडावा यासाठी पर्जन्ययाग करण्याचे नियोजन असुन महादेवाला रोज पहाटे अभिषेक करतांना कळकळची प्रार्थना केली जात आहे. संतश्रेष्ठ माऊली ज्ञानोबारायांनी देखील आपल्या ज्ञानेश्वरीत जलसंस्कृती संबंधातील, पर्जन्य, पर्जन्ययाग, पर्यावरण, लोकजलसंधारण, सिंचन, दुष्काळ, महापूर, तीर्थक्षेत्रे, गंगामहात्म आदी विषयाचे अत्यंत महत्त्वपूर्ण,विपुल सुरेख वर्णन केले असुन त्यातून जगातील मानवजातीकडेच नव्हे तर सर्व चराचर सृष्टीकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन त्यांनी स्पष्ट केला आहे.

## जाहिर नोटीस

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, शासकिय व निमशासकिय संस्था व सावकार यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतींचे वर्णन :- मौजे महिंदळे धुळे ता. जि. धुळे येथील सर्व्हे नं. ८८/२अ, पैकी, प्लॉट नं. २४ तसेच सि.स. नं. ५८८५ एकुण क्षेत्र १७० चौ.मी. तसेच ७/१२ उताराप्रमाणे १६६ चौ.मी, यास हि. खालील प्रमाणे

पुर्व - ६ मी रस्ता, पश्चिम- सर्व्हे नं. ८८,दक्षिण-६ मी रस्ता, उत्तर- प्लॉट नं. ३३

येणेप्रमाणे वर वर्णन असलेली आमचे अशिलांची मिळकत १) राजेंद्र ढोमण मोहिते २) ईश्वर गोकुळ शिरसाठ, यांनी खरेदी करण्याचे योजिले होते व त्या अनुषंगाने दि. ३०/०९/२०२२ रोजी सौदा पावती करारनामा पुढे ३ महिन्यांची मुदत (दिनांक २९/१२/२०२२ पर्यंत ) देवुन केला होता व त्यानुसार दि. ०२/१०/२०२२ रोजी लक्ष महाराष्ट्र या वृत्तपत्रात जाहीर नोटीस दिलेली होती. तथापि, सौदा पावती करारनाम्यात नमुद केल्याप्रमाणे १) राजेंद्र ढोमण मोहिते २) ईश्वर गोकुळ शिरसाठ यांनी ३ महिन्यांच्या आत सौदा करार पुर्ण न केल्यामुळे सौदा करार पावती मधील परिच्छेद क्र. ३ मधील अटी शर्तीचा भंग केलेला आहे त्यामुळे आमचे अशिल यांनी १) राजेंद्र ढोमण मोहिते २) ईश्वर गोकुळ शिरसाठ यांचेसोबतचा केलेला सौदा पावती करारनामा करार रद्द करण्यात आलेला असुन बयाणापोटी स्विकारलेली रक्कम परत करण्यात येणार आहे.

तरी, सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, दि.३०/०९/२०२२ रोजी केलेल्या सौदा पावती दस्त करारातील अटी प्रमाणे खरेदी करणार यांनी ३ महिन्यांच्या आत सौदा करार पुर्ण न केल्यामुळे खरेदी करणार यांनी सौदा करार पावतीनुसार मधील परिच्छेद क्र. ३ मधील अटी शर्तीचा भंग केलेला आहे. त्यामुळे उक्त नमुद मिळकतीसंदर्भातील दिनांक ३०/०९/२०२२ रोजीचा सौदा पावती करारनामा लिहुन घेणार व लिहून देणार रद्द करीत आहेत. सदर सौदा पावती दस्त करार ऐवजाप्रमाणे यापुढे वर नमुद मिळकत आमचे अशिल हे कोणासही विक्री, गहाण, बक्षिस अथवा अन्य कोणतेही मार्गाने तबदिल देवु शकतील त्या बद्दल १) राजेंद्र ढोमण मोहिते २) ईश्वर गोकुळ शिरसाठ व त्या दोघांचे वालीवारस, हक्कदार यांची कोणतीही हरकत किंवा अडथळा, हितसंबध, हक्क इ. राहणार नाही. तसेच दि. ०२/१०/२०२२ रोजी लक्ष महाराष्ट्र वृत्तपत्रातील जाहीर केलेली नोटीस सुध्दा आज रोजी संपुष्टात येत आहे.

तरी सदरचे मिळकतीचे बाबतील सौदा करार रद्द झालेसंदर्भात कुणाची हरकत असल्यास त्यांनी मुळ कागदपत्रांसह खालील पत्यावर ७ दिवसाचे आंत आपली लेखी हरकत नोंदवावी. सदरचे बाबतीत कुणाचीही हरकत न आल्यास सदर सौदा पावती करारनामा रद्द झालेला आहे व राहिल. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. तसेच परस्पर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दि. ३१/८/२०२३

नोटीस देणारतर्फे
**ॲड. पल्लवी. के. गायकवाड**
वकीलसंघ कार्यालय,
जिल्हा व सत्र न्यायालय, धुळे

# मधुमेहाला थांबविण्यासाठी त्रिसुत्रीचा वापर आवश्यक : डॉ. राणे

### दीर्घायुषी ज्येष्ठ नागरिक संघातर्फे व्याख्यानाचे आयोजन

**नाशिक । प्रतिनिधी**






भारत हा झपाट्याने मधुमेहाचे रूग्ण वाढत जाणारा देश म्हणून ओळखला जात असून याच मधुमेहाला थांबवायचे असेल तर उत्तम आहार, योग्य व्यायाम आणि वेळेवर उपचार या त्रिसुत्रीचा वापर करणे गरजेचे असल्याचे आवाहन नारायणी हॉस्पीटलचे मधुमेह व हृदयविकार तज्ञ डॉ. पंकज राणे यांनी केले.

दीर्घायुषी ज्येष्ठ नागरिक संघातर्फे आयोजित 'मधुमेह आणि हृदयविकार' या विषयावरील जनजागृतीपर व्याख्यानात डॉ. राणे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी नगरसेवक अमोल जाधव, संगिता जाधव, दीर्घायुषी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष श्रीकांत सुरते, रविंद्र वाटेकर, तुकाराम येवले, रमेश जगताप, रामदास बागुल, नारायण धामणे उपस्थित होते.

यावेळी डॉ. राणे म्हणाले की, भरपूर तहान लागणे, नेहमीपेक्षा भरपूरवेळा लघवीला जावं लागणं, जखमा फार संथपणे भरणं, दृष्टी कमकुवत होणं ही मुख्यत्वे मधुमेहाची लक्षणे असतात. डायबेटिस होऊ नये यासाठी स्वतःचं निरीक्षण करणं गरजेचं आहे. आपलं वजन, रक्तातील साखरेची पातळी, जीवनशैली यांचा विचार करणे महत्वाचे आहे.

सुरुवातीला श्रीकांत सुरते यांची ज्येष्ठ नागरिक संघाच्या कार्याची माहिती प्रास्ताविकातून उपस्थितांना दिली. तसेच माजी नगरसेवक अमोल जाधव यांनी ज्येष्ठांसाठी विविध योजना राबविण्यात येत असून ज्येष्ठांना आनंदी जीवन जगता यावे यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार असल्याचे सांगितले. यावेळी दीर्घायुषी ज्येष्ठ नागरिक संघाचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. अरविंद अत्तरदे यांनी आभार मानले तर सुत्रसंचालन रमेश जगताप यांनी केले.

लक्ष महाराष्ट्र

शुक्रवार, दि. १ सप्टेंबर २०२३



## न्यूज कॉलम

### राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त जयहिंदमध्ये क्रीडा स्पर्धा

धुळे । राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त जयहिंदमध्ये क्रीडा स्पर्धा धुळे येथील जयहिंद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात २९ ऑगस्टला मेजर ध्यानचंद यांची जयंती राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरी करण्यात आली. प्रभारी प्राचार्य एस. व्ही. बेसाणे अध्यक्षस्थानी होते. पर्यवेक्षक एस. डी. मोरे, व्ही. टी. गवळे, सौ. एम. व्ही. पिंपळीसकर, योगेश शिंदे प्रमुख पाहुणे होते. मान्यवरांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

### आघाव अध्यापक विद्यालयात क्रीडा स्पर्धा

धुळे । श्री शिवाजी विद्याप्रसारक संस्थेच्या आघाव अध्यापक विद्यालयात हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त क्रीडा विभागातर्फे २८ ऑगस्टला विविध क्रीडा स्पर्धा झाल्या. विद्यालयाचे प्राचार्य पी. एस. सोनवणे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. संगीत खुर्ची, मनोरे मोडणे, बादलीत बॉल टाकणे यांसारख्या मनोरंजक खेळांचा या स्पर्धेत समावेश होता. संगीत खुर्ची स्पर्धेत सुरेखा चौधरी, अश्विनी देवरे, गायत्री साळुंखे, रूपेश पाटील. मनोरा मोडणे स्पर्धेत रूपेश पाटील, बादलीत बॉल टाकणे स्पर्धेत योगेश्वरी चव्हाण, दर्शना अहिरराव विजेते ठरले. सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. एच. आर. बडगुजर यांनी प्रास्ताविक केले.

# धुळे जिल्हा दुष्काळी जाहीर करा!

## जिल्हा बँकेचे अध्यक्ष राजवर्धन कदमबांडे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

धुळे । प्रतिनिधी

जिल्ह्यात पावसाअभावी दुबार पेरणीचे संकट निर्माण झाले आहे. शेतकर्यांसमोर उभे ठाकलेले संकट बघता शासनस्तरावर पाठपुरावा करून संपुर्ण धुळे जिल्हा दुष्काळी परिस्थिती म्हणून जाहीर करावा, अशी मागणी जिल्हा बँकेचे अध्यक्ष तथा माजी आ.राजवर्धन कदमबांडे यांनी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात त्यांनी जिल्हा बँकेतर्फे शेतकर्यांना वाटप केलेल्या पिककर्जाचा लेखाजोखाही सविस्तर मांडला आहे. निवेदनात म्हटले आहे की, धुळे नंदुरबार जिल्हा बँकेने लक्षांकाच्या १२३ टक्के पीक कर्जवाटप केले आहे. सदर पीक कर्ज वाटप दिलेल्या लक्षांकानुसार पुर्ण करण्यासाठी जिल्हा बँकेकडे स्वनिधी शिल्लक नसल्यामुळे जिल्हा बँकेने महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून १०० कोटी ९.७५ टक्के व्याजदराने उचल कर्ज घेवुन धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील ६०१ विविध कार्यकारी सहकारी संस्था व आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांना ६ टक्के व्याजदराने शेती पीक कर्ज वाटप केले आहे. त्यामुळे जिल्हा बँकेस दरवर्षी पीक कर्ज वाटपापासून मोठ्या प्रमाणावर तोटा होतो. तरी देखील जिल्हा बँक शासनाचा आदेश व शेतकर्यांचे हितासह सामाजिक दृष्टीकोन लक्षात ठेवून बँकेने दरवर्षी दिलेल्या लक्षांकापेक्षा जास्तीने पीक कर्ज वाटप करीत आहे. यात धुळे जिल्ह्यातील २० हजार ५५२ शेतकरी सभासदांना २६ हजार ३५७ हेक्टर लागवडी खालील क्षेत्रासाठी सन २०२३-२४ खरीप कर्जवाटप हंगामात १९७.६८ कोटीचे पीक कर्जवाटप केले आहे. तसेच नंदुरबार जिल्ह्यातील ११ हजार ७४७ शेतकरी सभासदांना १९ हजार ९४२ हेक्टर लागवडीखालील क्षेत्रासाठी सन २०२३- २४ खरीप कर्ज वाटप हंगामात १४९.५७ कोटीचे कर्जवाटप केले आहे. यासह बँकेने सामाजिक बांधिलकी व शेतकर्यांचे हित तसेच शासनाच्या आदेशानुसार नाममात्र १ रूपया घेवुन कर्जदार व बिगर कर्जदार शेतकर्यांच्या उभ्या पीकाचा पीक विमा प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत घेण्यात आला आहे. या तुलनेत दोन्ही जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत/ व्यापारी बँका मात्र शेतकर्यांची अडवणूक करून कर्जवाटप करण्यात कुचराई करीत आहेत. त्यांनी लक्षांकाच्या केवळ२० टक्के पीक कर्ज वाटप केले आहे. सदर पीक कर्ज वाटप हे फक्त सधन शेतकर्यांनाच देतात. मात्र जिल्हा बँक, अल्प, अत्यल्प भूधारक यांना देखील पीक कर्ज वाटप करते. म्हणून जिल्हा बँकेने दिलेल्या लक्षांकापेक्षा ६४.६३ कोटीने जास्तीने शेती पीक कर्जवाटप करून शेतकर्यांना आर्थिक मदत केली आहे. दुष्काळी परिस्थिती पहाता शेतकरी हितासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करून संपुर्ण धुळे जिल्हा दुष्काळी परिस्थिती म्हणून जाहीर करावा, अशी विनंती बँकेचे अध्यक्ष तथा माजी आमदार राजवर्धन कदमबांडे यांनी जिल्हाधिकार्यांकडे केली आहे. निवेदन देतेवेळी राजवर्धन कदमबांडे यांच्यासोबत बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी धिरज चौधरी हे देखील उपस्थित होते.



### दुष्काळात व्हावी मदत

**राष्ट्रीयकृत बँका सामान्य,अल्प, अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांना पीक कर्ज देत नसल्याने ते जिल्हा बँकेकडून कर्जाची अपेक्षा ठेवतात. त्यामुळे राष्ट्रीयीकृत बँकांकडील शून्य टक्के व्याजदराचा शासन निधी जिल्हा बँकेकडे वळता केल्यास तो अशा शेतकऱ्यांना देता येऊ शकेल. त्यातून जिल्ह्याचे यंदाचे पतपुरवठ्यासंबंधी उद्दिष्ट पूर्ण होऊ शकेल. शिवाय जिल्ह्यात सरासरीच्या ५० टक्क्यांपेक्षा कमी पावसाची नोंद आहे. शेतकरी चिंताग्रस्त आहे. पीक करपते आहे. दुबार पेरणीचे संकट आहे. जलस्त्रोतांमध्ये अल्प साठा आहे. पाणी, चाऱ्याचा प्रश्न आहे. त्यामुळे जिल्ह्यात दुष्काळ जाहीर व्हावा यासह जिल्हा बँकेच्या अन्य मागण्या जिल्हाधिकाऱ्यांनी पूर्ण कराव्यात, अशी अपेक्षा श्री. कदमबांडे, उपाध्यक्ष दीपक पाटील, संचालक मंडळासह सीईओ चौधरी यांनी व्यक्त केली.**

## कर्म.आ.मा.पाटील महाविद्यालयात जागतिक उद्योजकता दिन साजरा



पिंपळनेर । प्रतिनिधी

शेळीपालन, कुक्कुटपालन व इतर कोणताही उद्योग व्यवसाय करायचा असेल तर त्याला नियोजन, मेहनत घेणे गरजेचे असते असे प्रतिपादन डॉ.मिलिंदराज बर्डे यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.के. डी.कदम हे होते. विचारमंचावर प्रो. डॉ. बी. सी. मोरे, प्रा. डॉ. सतीश मस्के प्रा. डॉ. वाय.एम. नांद्रे हे होते.

कर्म.आ.मा.पाटील कला, वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात करिअर कट्टा व आय.क्यु. ए.सी. संयुक्त विद्यमाने शासनाच्या व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार ' जागतिक उद्योजकता दिन' साजरा करण्यात आला. या या कार्यक्रमात बोलताना प्रमुख मार्गदर्शक वार्सा येथील पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. मिलिंदराज बर्डे म्हणाले की, उद्योग व्यवसाय हा एक मानवी जीवन उंचावण्यासाठी महत्त्वाचा आहे. त्यामध्ये शासनही उद्योग करणाराला सबसिडी देऊन मदत करते. शेळीपालन, कुक्कुटपालन, गोपालन, मच्छि पालन व इतर व्यवसायाच्या संदर्भात उपयुक्त ती माहिती दिली. त्याचबरोबर त्यांचे अन्न, आजार, घ्यावयाची काळजी याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवोपक्रम,नवसंशोधन मंडळ प्रमुख प्रो. डॉ. बी.सी.मोरे यांनी केले. आभार प्रा. डॉ.वाय.एम. नांद्रे यांनी मानले. कार्यक्रमाला बहुसंख्य प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

# साक्री तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा

साक्री । प्रतिनिधी

यंदाच्या हंगामात साक्री तालुक्यासह जिल्हाभरात किंबहुना संपूर्ण राज्यात सरासरीपेक्षा अत्यंत कमी पाऊस झाल्याने भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. गेल्या तीन महिन्यात झालेल्या अत्यंत कमी पावसामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणात अडचणीत आल्याने साक्री तालुका दुष्काळी जाहीर करून या अनुषंगाने शेतकऱ्यांना शासनातर्फे सर्वतोपरी सहकार्य केले जावे अशी मागणी अखिल भारतीय पत्रकार परिषद संलग्न साक्री तालुका मराठी पत्रकार संघातर्फे करण्यात आली. तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना हे निवेदन पाठविण्यात आले. तहसीलदार सोनवणे यांनी निवेदन स्वीकारले.

यात प्रामुख्याने दुष्काळात लागू होणाऱ्या सर्व सवलती साक्री तालुक्यात लागू कराव्यात, दुष्काळाशी सामना करण्यासाठी प्रशासनाने सज्ज राहावे. तसेच दुष्काळामुळे निर्माण झालेली चारा टंचाई व पाणीटंचाई निवारणार्थ व्यवस्था करावी, टंचाईचा आढावा घेऊन पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करावेत. दुष्काळामुळे खरीप पिकांच्या झालेल्या नुकसानीची मध्य हंगामातील प्रतिकुलता जाहीर करून विमा कंपन्यांचे प्रतिनिधी व अधिका-यांची बैठक घ्यावी आणि २५% अग्रीम विमा रक्कम शेतकऱ्यांना द्यावी. या अडचणीच्या प्रसंगी जगाचा पोशिंदा असणाऱ्या बळीराजाच्या पाठीशी शासन, प्रशासनाने खंबीरपणे उभे राहावे. तसेच शासनाने याआधी जाहीर केलेलं कांद्यावरील अनुदान देखिल वितरित केले जावी अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

यावेळी पत्रकार संघाचे मार्गदर्शक सुभाष काकुस्ते, अध्यक्ष विजय भोसले, कार्याध्यक्ष धनंजय सोनवणे, सरचिटणीस लक्ष्मीकांत सोनवणे, उपाध्यक्ष सागर काकुस्ते, प्रसिद्धीप्रमुख पी.झेड.कुवर, ज्येष्ठ सदस्य बी.एम.भामरे, सतीश पेंढारकर, योगेश हिरे यांच्यासोबतच शिवसेना तालुकाप्रमुख पंकज मराठे हे उपस्थित होते.



## वाको इंडिया राष्ट्रीय किकबॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये




मुंबई । प्रतिनिधी

वाको ज्युनियर किकबॉक्सिंग चॅम्पियनशिप २०२३ स्पर्धा हरिवंश ताना भगत इनडोअर स्टेडियम, रांची, झारखंड येथे पार पडली. स्पोर्ट्स किकबॉक्सिंग असोसिएशन मुंबई शहर चे अध्यक्ष आणि प्रशिक्षक श्री उमेश जी मुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली दुर्वा गावडे आणि आलोक ब्रीद यांनी या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राकरिता रौप्य पदक पटकावत उल्लेखनीय कामगिरी केली.

या नॅशनल किक बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये एकूण २८ राज्यांनी सहभाग घेतला. दुर्वा गावडेचे अपवादात्मक कौशल्य आणि अटूट दृढनिश्चय याने जबरदस्त विजय मिळवला आणि तिला पॉइंट फाईट प्रकारात रौप्य पदक मिळवून दिले. त्याचप्रमाणे, आलोक ब्रीदने पॉइंट फाईटमध्ये कांस्यपदकासह क्रिएटिव्ह फॉर्म या प्रकारात रौप्य पदक मिळवून आपले पराक्रम दाखवला. उमेश मुरकर आणि विघ्नेश मुरकर यांच्या मार्गदर्शनात दुर्वा गावडे ही महाराष्ट्र सेवा मंडळ, गणेश गल्ली, लालबाग येथे तर आलोक ब्रीद हा सायनमधील अवर लेडी ऑफ गुड कौन्सिल हायस्कूलमध्ये परिश्रमपूर्वक किक बॉक्सिंगचे प्रशिक्षण घेत आहेत. दुर्वा आणि आलोक यांच्या उत्कृष्ट कामगिरीच्या व्यतिरिक्त, शिद्दत गुप्ता, ग्रिशम पटवर्धन, देवांश झा, यथार्थ बुडमला आणि कशिश जैस्वार यांनीही उत्साहाने आणि निर्धाराने सहभाग घेतला. यावेळी ते पदकांपासून वंचित राहिले असले तरी त्यांच्या प्रतिभा आणि खिलाडूवृत्तीच्या प्रशंसनीय प्रदर्शनाने सर्व निरीक्षकांवर अमिट छाप सोडून योग्य प्रशंसा मिळविली. या सर्व खेळाडूंना प्रशिक्षणाकरिता साहित्य व प्रशिक्षण गुरुकुल कृती फौंडेशन ट्रस्ट व एस एस के के ए या संस्थेच्या माध्यमातून देण्यात आले.

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



शिंदखेडा । प्रतिनिधी

महादेव बंगला भिलाटी येथील जि.प मराठी शाळा आणि नदीबार भिलाटी येथील जि.प मराठी शाळा येथील विद्यार्थ्यांना शिक्षणाविषयी आपुलकी, गोडी निर्माण व्हावी शिक्षणात रुची निर्माण व्हावी या उद्देशाने पहिली ते चौथीतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. खरंच या विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित न राहू देता एक छोटासा उपक्रम राबवण्याचा प्रयत्न अमोल शिंपी व मुकेश अहिरे व मित्रपरिवार यांनी सुरू केला असून मागील आठ वर्षापासून गरीब व गरजू विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करतात.

यावर्षीही त्यांनी विद्यार्थ्यांना इंग्लिश प्रायमर पुस्तक, वही, पेन, खोड रबर, पेन्सिल, पट्टी, कंपास बॉक्स व शाळेतील हॉलकरिता ०३ एलईडी ट्यूबलाइट व ८०विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले असून नदीपार भिलाटी येथील एकूण ४० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व ०१ एलईडी ट्यूबलाईट देण्यात आले. महादेव भिलाटी येथील महाजन सर,परदेशी यांनी या कार्याबद्दल अभिनंदन व आभार प्रकट केले व नदी पार भिलाटी येथील जिल्हा परिषदचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी गरजू व गरीब विद्यार्थ्यांना या साहित्याची खरोखरच आवश्यकता असल्याचे आणि त्यापासून या विद्यार्थ्यांना खरोखरच एक प्रेरणा मिळेल असे मत मांडले व मान्यवरांचे आभार मानले.

## साक्री येथे ग्रँड सॅल्यूट टू इस्त्रो अभियान

साक्री । प्रतिनिधी

भारताने नुकतीच चंद्रयान ३ मोहीम यशस्वी केली. या मोहिमेसाठी इस्रोच्या वैज्ञानिकांनी केलेल्या प्रयत्नांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव विद्यार्थी विकास विभाग व विद्या विकास मंडळाचे सिताराम गोविंद पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रँड सॅल्यूट टू इस्रो अभियान ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात आले.

महाविद्यालयात या कार्यक्रमाप्रसंगी लोकनेते माणिकराव गावित महाविद्यालय विसरवाडीच्या प्राचार्य डॉ जयश्री गावित, साक्रीचे भूमिपुत्र व इटलीतील तरुण शास्त्रज्ञ डॉ सिद्धार्थ देवरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राजेंद्र अहिरे, उपप्राचार्य डॉ अनंत पाटील, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. पंकज अहिरे प्रसंगी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाच्या तांत्रिक बाबी डॉ. दीपक नगराळे, डॉ. प्रदीप राठोड यांनी सांभाळल्या तर सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील २२ प्राध्यापक, ५३ विद्यार्थी व विद्यार्थिनी ऑनलाइन पद्धतीने इस्रोच्या वैज्ञानिकांना ग्रँड सॅल्यूट केले. चंद्रयान ३ च्या यशस्वीतेचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागाने चंद्रयान-३ रांगोळी व मेहंदी स्पर्धेचे आयोजन केले होते. सदर रांगोळी स्पर्धेत महाविद्यालयातील ११ संघानी सहभाग घेतला होता. त्यामध्ये परीक्षकांच्या निकालांती प्रथम क्रमांक सुनीता विल्यम ग्रुप, द्वितीय क्रमांक राजमाता जिजाऊ ग्रुप, तृतीय क्रमांक कल्पना चावला ग्रुप या संघाची निवड करून बक्षीस देण्यात आले. तसेच मेहंदी स्पर्धेत ६ स्पर्धकांनी सहभाग घेतला त्यामध्ये निकालांती प्रथम क्रमांक कु. खाटीक सना रहीम, द्वितीय क्रमांक कु. बेलदार सिमरन हमीद तर तृतीय क्रमांक क. नगराळे दिव्या किशोर सदर त्यांची निवड करून बक्षीस देण्यात आले. स्पर्धेच्या आयोजनात कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा डी पी पाटील, प्रा. एस टी सूर्यवंशी सौ. खैरनार मॅडम व कनिष्ठ विभागातील सर्व प्राध्यापक बंधू-भगिनींनी परिश्रम घेतले. बक्षीस पत्र विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्षा सौं. मंगला सुरेश पाटील, सचिव आबासाहेब सुरेश रामराव पाटील, उपाध्यक्ष भैयासाहेब चंद्रजी सुरेश पाटील, प्रशासकीय अधिकारी प्राचार्य डी एल तोरवणे, प्राचार्य आर आर अहिरे उपप्राचार्य अनंत पाटील, कनिष्ठ महाविद्यालय पर्यवेक्षक डी पी पाटील शिक्षक व शिक्षकेतर बंधूंनी कौतुक केले.



# घरगुती गॅस सिलिंडर २०० रुपयांनी स्वस्त..!

### भाजप महिला आघाडीकडून फटाके फोडून आनंदोत्सव

धुळे । प्रतिनधी

केंद्रातील मोदी सरकारने घरगुती गॅस सिलेंडरचे दर २०० रुपये तर उज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना ४०० रुपयांनी कमी केले. देशातील महिलांना मोदी सरकारने रक्षबंधानाची मोठी भेट दिल्याचे सांगत धुळ्यातील भाजप धुळे महानगरतर्फे फटाके फोडून व एकमेकांना पेढे भरवून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

याबाबत माहिती देताना महिला प्रदेश उपाध्यक्षा जयश्रीताई अहिरराव यांनी सांगितले की, श्रावण महिन्यात साजरा होणारा रक्षबंधन सण हा महिलांसाठी आनंदाची पर्वणीच असतो. या सणाचा गोडवा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आणखी वाढविला आहे. त्यांनी घरगुती गॅस सिलिंडरचे दर २०० रुपयांनी तर उज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना ४०० रुपयांनी कमी केले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी घेतलेल्या या निर्णयाचा फायदा ३३ कोटी ग्राहकांना होणार आहे. तर ७५ लाख उज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना नवीन गॅस कनेक्शन मिळणार आहे. यानिमित्त धुळे भाजपा महानगरतर्फे फटाके फोडून व पेढे भरून आनंद उत्सव साजरा करण्यात येत असल्याचे श्रीमती अहिरराव यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, भाजप जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, प्रदेश महिला उपाध्यक्ष जयश्री अहिरराव, महापौर प्रतिभा चौधरी, नगरसेविका कल्याणी अंपळकर, नगरसेवक हिरामण गवळी, नगरसेविका सुरेखा उगले, वंदना थोरात, वैभवी दुसाने, आरती पवार, सभागृह नेता भारती माळी, नगरसेविका योगिता बागुल, वैशाली शिरसाठ, निशा चौबे, नगरसेविका वंदना भामरे, ओम खंडेलवाल, अमोल मासुळे, रावसाहेब गिरासे, प्रशांत बागुल, महेश मुळे, योगेश मुकुंदे, यशवंत येवलेकर, राजेश पवार, सचिन शेवतकर, पंकज विंचू, सुहास अंपळकर, विनोद खेमनार, सजन चौधरी, नगरसेवक दगडू बागुल, संदीप बैसाणे, सागर कोडगीर, नगरसेविका स्नेहल जाधव, जितू चौटीया, संदीप अग्रवाल, राजेंद्र खंडेलवाल, चेतन मंडोरे, पंकज धात्रक, तुषार भागवत, सागर लाड, जीवन शेंडगे, पवन जाजू, अनिल थोरात, आकाश परदेशी, छोटू थोरात, गीता कटारिया, मनोज चौधरी आदी उपस्थित होते.



## मोफत उद्योजकता विकास प्रशिक्षणाचा लाभ घेण्याचे आवाहन

नाशिक । प्रतिनिधी

बँक ऑफ महाराष्ट्र, ग्रामीण मंत्रालय भारत सरकार व महाबँक आर-सेटी प्रशिक्षण सस्थेतर्फे मोफत उद्योजकता विकास प्रशिक्षण देण्यात येणार असून त्यासाठी मुलाखतद्वारे निवड करण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षणाकरीता मुलाखत दि. १ ते ६ सप्टेंबर यादरम्यान घेण्यात येणार आहे.

या प्रशिक्षणामध्ये, उद्योजकीय सक्षमता, उद्योग संधी निवड, संभाषण कौशल्य, व्यवसाय सुरू करताना जागेची निवड, मार्केटिंग, मार्केट सर्व्हे, बँकेच्या आणि सरकारच्या विविध कर्ज योजना, सबसिडी योजना, व्यक्तीमत्व विकास, प्रकल्प अहवाल, प्रत्यक्ष यशस्वी उद्योगाला भेट आदींबाबत तज्ञांद्वारे मार्गदर्शन मिळणार आहे. ज्यांना नवीन उद्योग सूरू करावयाचा असेल, किवा ज्यांचा उद्योग सूरू असेल, अशांनी सदर प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा. मुलाखतीला येताना आाधार कार्ड, पॅन कार्ड, शाळा सोडल्याचा दाखला, रेशन कार्ड, मतदान कार्ड, बँक पासबूक झेरॉक्स सोबत घेऊन येणे. प्रशिक्षण संस्थेचा पत्ता महाबँक आर-सेटी प्रशिक्षण संस्था, गोवर्धन ग्रामपंचायतीच्या शेजारी गोवर्धन, गंगापुर, नाशिक असा आहे. तर ८२३७८६१७२७, ९८९०३८३८९४,७८२०८९००७३ या मोबाईल नंबरवर सकाळी १० ते ५ या कार्यालयीन वेळेतच संपर्क साधावा. मुलाखत वेळ १० ते ४ वाजेपर्यंत आहे.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# आनंदाचा शिधा' लाभार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचवा

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहकसंरक्षण मंत्री छगन भुजबळ यांचे निर्देश











नाशिक । गौरी

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत आनंदाचा शिधा वितरणाचा निर्णय शासनाने घेतला आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत गणेशोत्सवाच्या आधी आनंदाचा शिधा लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवावा व त्यासाठी काटेकोर नियोजन करावे,असे निर्देश राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी येथे दिले. मंत्री छगन भुजबळ हे औरंगाबाद येथे आले असता त्यांनी काल पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचा आढावा घेतला. बैठकीस पुरवठा उपायुक्त गव्हाणे, जिल्हा पुरवठा अधिकारी वर्षाराणी भोसले, सहा. पुरवठा अधिकारी सोनाली जोंधळे, सहनियंत्रक वजनमापे सुरेश चाटे, उपनियंत्रक रमेश दराडे, सहायक नियंत्रक एस.वाय.मुंडे, डी.व्ही गावडे आदी उपस्थित होते.औरंगाबाद विभागात आठही जिल्हे मिळून गौरी गणपती उत्सवानिमित्त द्यावयाच्या आनंदाचा शिधा संदर्भात माहिती देण्यात आली. विभागात अन्न धान्य वितरणाची सरासरी आकडेवारी लक्षात घेता आनंदाचा शिधा साठी ३२ लाख ७६ हजार ३८७ शिधाजिन्नस संचाची मागणी नोंदविण्यात आली आहे, अशी माहिती देण्यात आली. विभागातील गोदामांच्या सद्यस्थितीबाबत, शिवभोजन देयकांच्या अदायगीबाबत आढावा घेण्यात आला. भुजबळ म्हणाले की, गोदामांच्या दुरुस्तीसाठी जिल्हा नियोजन समितीकडून १० लाख रुपयांपर्यंतच्या दुरुस्ती कामासाठी निधी मिळावा, अशी तरतूद करण्यात येईल. शेतकऱ्यांच्या हितासाठी साखर कारखान्यांमध्ये उसाचे अचूक मोजमाप व्हावे यासाठी बनविण्यात आलेल्या प्रमाणित संचालन कार्यप्रणालीचे काटेकोरपणे पालन करन्याचे निर्देश यावेळी भुजबळ यांनी वैधमापन विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. या प्रणालीनुसार साखर कारखान्यांमध्ये वापरात असणाऱ्या वे ब्रीजमध्ये डिजीटल लोड सेल बसविण्यात यावा व या हंगामापासून प्रमाणित संचालन कार्यप्रणालीची अंमलबजावणी करावी, असे निर्देश भुजबळ यांनी दिले. तसेच विभागातील प्रश्न आणि अडीअडचणींची माहितीही त्यांनी जाणून घेतली.

CMYK
दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# रक्षाबंधन सण शहरात विविध उपक्रमांनी साजरा

## धुळे महानगरतर्फे फटाके फोडून व एकमेकांना पेढे भरवून आनंदोत्सव















धुळे । शहर व परिसरातील विविध सामाजिक संघटनांच्यावतीने रक्षाबंधन सण विविध उपक्रमांद्वारे साजरा करण्यात आला. रिक्षाचालक, लष्करी जवान तसेच निरीक्षणगृहातील झाडांना राखी बांधण्यात आली. काही संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी निरीक्षणगृहातील विद्यार्थिनींकडून राखी बांधून घेतली. काही शाळांनी झाडांना राखी बांधून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. तसेच केंद्रातील मोदी सरकारने घरगुती गॅस सिलेंडरचे दर २०० रुपये तर उज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना ४०० रुपयांनी कमी केले. देशातील महिलांना मोदी सरकारने रक्षबंधानाची मोठी भेट दिल्याचे सांगत आज धुळ्यातील भाजप धुळे महानगरतर्फे फटाके फोडून व एकमेकांना पेढे भरवून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यानिमित्त धुळे भाजपा महानगरतर्फे फटाके फोडून व पेढे भरून आनंद उत्सव साजरा करण्यात येत असल्याचे श्रीमती अहिरराव यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, भाजप जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, प्रदेश महिला उपाध्यक्ष जयश्री अहिरराव, महापौर प्रतिभा चौधरी, नगरसेविका कल्याणी अंपळकर, नगरसेवक हिरामण गवळी, नगरसेविका सुरेखा उगले, वंदना थोरात, वैभवी दुसाने, आरती पवार, सभागृह नेता भारती माळी, नगरसेविका योगिता बागुल, वैशाली शिरसाठ, निशा चौबे, नगरसेविका वंदना भामरे, ओम खंडेलवाल, अमोल मासुळे, रावसाहेब गिरासे, प्रशांत बागुल, महेश मुळे, योगेश मुकुंदे, यशवंत येवलेकर, राजेश पवार, सचिन शेवतकर, पंकज विंचू, सुहास अंपळकर, विनोद खेमनार, आदी उपस्थित होते.

संकलन : दिपक वाघ